CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. १७ सप्टेंबर २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३४८ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# चिडलेले संस्था चालक शाळेत घुसले, मुलांदेखतच हेडमास्तरांना बदडले

## अनुदान येताच तोंडाला पाणी सुटले-गोरखधंद्याला विरोध होताच पदाधिकारी भडकले

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी रस्त्यावरील यत्नाळ या गावात एका खाजगी शाळेत शुक्रवारी भलताच राडा झाला. वर्ग सुरू असतानाच संस्थाचालक व त्यांचे सहकारी पदाधिकारी शाळेत घुसले आणि त्यांच्याकडून चक्क मुख्यापकांनाच मारहाण सुरू झाली. आरडाओरडा आणि गोंधळ माजल्याने वर्गातील शिक्षक व मुले घाबरून बाहेर आली. चवताळलेल्या पदाधिकाऱ्यांनी त्या सर्वांसमोर लाथाबुक्क्या व दगडाने मारहाण करून हेडमास्तरांना बदडले. त्यानंतर तुम्ही माझ्या शाळेत दिसलात तर जिवंत ठेवणार नाही,अशी धमकी देऊन निघून गेले. आतापर्यंत ही शाळा विना अनुदानावर सुरू होती.अनुदान येऊ लागताच संस्थाचालकांच्या तोंडाला पाणी सुटले. लाखो रुपये घेतलेल्या जुन्यांना काढून नवी भरती केली तर अजून लाखोंच्या देणग्या मिळतील,अशी स्पप्ने या संस्थाचालकांना पडली आहेत. शिक्षकांनी एक होऊन हा गोरखधंदा हाणून पाडण्यास सुरुवात केली आहे.त्यातूनच हा संघर्ष पेटल्याचे सांगण्यात येते.**

## यत्नाळच्या खासगी शाळेतील राडा

याप्रकरणी मुख्याध्यापक व संस्थाचालकांनी परस्परांविरुद्ध वळसंग पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की- मुख्याध्यापक विलास बाबूराव सुतार यांना संस्था अध्यक्ष गेनसिध्द बंडगर आणि सचिन गेनसिध्द बंडगर या दोघांनी मिळून 'तू शाळेत येऊ नको' असे म्हणून दगडाने मारहाण केली तसेच त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी देखील दिली. संस्थाचालकांच्या या मनमानी कारभाराला वैतागून या प्रशालेतील सर्व कर्मचाऱ्यांनी काही महिन्यांपूर्वी उपोषण देखील केले होते. या संदर्भात मारहाण झालेले मुख्याध्यापक विलास सुतार यांनी वळसंग पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गेनसिध्द बंडगर, राधाकृष्ण बंडगर, बिर्याणीसिध्द जगदेव थोरात, सुनील हिरापुरे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. मुख्याध्यापक व शिक्षकांनी आपणास मारहाण करून धमकी दिल्याची तक्रार यत्नाळ येथील कै.व्यंकय्या गुत्तेदार प्रशालेचे सचिवांनी दिली आहे. त्यानुसार तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. मुख्याध्यापकाच्या तक्रारीनंतर शाळेचे सचिव राधाकृष्ण बंडगर यांनी फिर्याद दिली आहे. शाळेतील कपाटाचे सील तोडल्याप्रकरणी आम्हाला शिवीगाळ केल्याची तक्रार देण्यात आली आहे. त्यानुसार मुख्याध्यापक विलास सुतार, सैफन नगारे व शिवानंद चौगुले यांच्या विरुध्द याप्रकरणी वळसंग पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. सुतार यांना संस्थाचालकांनी कामावरून कमी केले.त्याविरुद्ध त्यांनी शिक्षण खात्याकडे दाद मागितली.सुतार यांना रुजू करून घेण्याचा आदेश शिक्षण खात्याने दिला मात्र संस्थाचालकांनी हजर करून घेण्यास नकार दिला. त्यातूनच वादावादी झाली. त्याचे पर्यावसन हाणामारीत झाले. प्रशालेतील मुख्याध्यापक व इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून संस्थापक अध्यक्ष व सचिव यांनी १०-१५ वर्षे विनावेतन काम करून घेतले. शासन नियम सांगतो की- विनाअनुदानित तत्त्वावर नोकरी करणा-या शिक्षक- कर्मचाऱ्यांना शासन नियमानुसार वेतन देणे संस्थेवर बंधनकारक असताना प्रशालेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एक छदामही संस्थाध्यक्ष किंवा सचिव यांनी दिला नाही.जसे प्रशालेस सुरुवातीला २०% व त्यानंतर ४०% वेतन अनुदान शासनाकडून प्राप्त झाले, तसे संस्थापक व सचिव यांनी पैशासाठी कर्मचाऱ्यांना त्रास द्यायला सुरुवात केली.त्याची दखल शिक्षण खात्याने घेतल्याचे एका वरिष्ठ सूत्राने सांगितले.

महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावलीमधील चौकशी समितीच्या कलमांचा पद्धतशीररीत्या गैरवापर करून काही शिक्षक व कर्मचारी यांना सेवेतून कमी करण्याचा प्रयत्न देखील केला. पण हे सर्व प्रयत्न असफल झाल्यानंतर त्यांनी प्रशालेत जाऊन मुख्याध्यापकास पूर्वनियोजित कट आखून मारहाण केली तसेच कपाटाचे कुलूप तोडून शाळेतील कार्यालयीन दप्तर पळवले. त्याचबरोबर काही शिक्षकांना शाळेतून हाकलून दिले. यापुढे जर माझ्या शाळेत तुम्ही आलात तर तुमचे हात पाय तोडेन असा सज्जड दमदेखील भरला. शाळेतील हा सर्व प्रकार विद्यार्थ्यांसमोर घडला. तरी संबंधितांवर तत्काळ कारवाई व्हावी,अशी पालकवर्गाची मागणी आहे.मारहाणीचा प्रकार घडल्यानंतर सर्व शिक्षक एकवटले व या मारहाणीचा निषेध केला.



सदर घटनेचा निषेध करताना शिक्षक व कर्मचारी


## पनाश टॉवर नवव्या मजल्यावरील खरेदी तुर्त करू नये : आयुक्त

### ६३२ चौरस मीटर कमर्शियल जागा गॅलोर कंपनीने महापालिकेला देण्याचे आदेश

✔ सुराज्य/सोलापूर

विजापूर रोडवरील बहुचर्चित पनाश टॉवर नवव्या मजल्यावरील खरेदी नागरिकांनी करू नये, असे आवाहन महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी केले आहे. त्याचबरोबर १६३२ चौरस मीटर इतकी कमर्शियल वापरातील पुढील बाजूची जागा गॅलोर कंपनीने महापालिकेला द्यावी, असे आदेशही महापालिका आयुक्तांनी दिले आहेत.

नियोजित तब्बल १७ मजली पनाश टॉवर बांधकाम प्रकरणी पुण्यातील गॅलोर कंपनीला महापालिका प्रशासनाच्या वतीने बजावलेल्या नोटिसीच्या खुलाशावर शासनाचे मार्गदर्शन महापालिका आयुक्तांनी मागविले आहे. या टॉवरमध्ये कंपनीकडून वाढीव एफएसआयप्रमाणे वाढीव हिस्साही महापालिकेने घेतला पाहिजे का? यासह इतर मुद्यांसंदर्भात प्रामुख्याने मार्गदर्शन मागवण्यात आल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. पनाश टॉवर मधील



नव्या मजल्या वरील फ्लॅट खरेदी नागरिकांनी करू नये असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. दरम्यान, शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात येत आहे.

त्यामुळे नवव्या मजल्यावरील खरेदी तूर्तास थांबविण्यात यावी या संदर्भात ही तातडीने महापालिका आयुक्तांनी जिल्हाधिकारी यांना पत्र दिले आहे. दरम्यान, या टॉवर मधील १६३२ चौरस मीटर इतकी कमर्शियल वापरातील पुढील बाजूची जागा गॅलोर कंपनीने महापालिकेला द्यावी, असे आदेशही महापालिका आयुक्तांनी गॅलोर कंपनीला दिले आहेत.


## प्रभारी क्रीडाधिकारी नजीर शेख यांच्यावर निलंबनाची कारवाई

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेचे कनिष्ठ श्रेणी लिपिक तथा प्रभारी क्रीडाधिकारी नजीर दाऊदसाब शेख यांच्यावर आयुक्त पी. शिवशंकर यांनी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

शासकिय स्पर्धा आयोजनासाठी झालेल्या खर्चाची बिले लेखा परीक्षणासाठी उपलब्ध करून दिली नाहीत. पार्क स्टेडियम गाळे भाडे वसुली, डिमांड रजिस्टर अद्ययावत न ठेवणे या अधिनस्त कर्मचाऱ्यांच्या कामावर कोणतेही नियंत्रण ठेवले नाही. दोन तुकडे पध्दतीने साहित्य खरेदी, कामकाजात अनियमितता आदी अनेक ठपके ठेवण्यात आले असून याप्रकरणी शेख यांची विभागीय चौकशी कार्यान्वित करण्यात आली आहे. दरम्यान, या चौकशीस बाधा येऊ नये म्हणून प्रभारी क्रीडाधिकारी नजीर शेख यांना सेवेतून तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. निलंबित करण्यात येत असल्याचे आदेश महापालिका शिवशंकर यांनी दिले आहेत.

## करजगी येथे दहा घरे फोडली



✔ सुराज्य/अक्कलकोट

करजगी (ता.अक्कलकोट) येथे गुरूवारी १५ सप्टेंबर रोजी रात्री पावणेअकरा ते वा. ते पहाटे साडेपाच वा. चे पाच घरे फोडून अज्ञात चोरट्याने २८ हजार चारशे रुपयांचा ऐवज चोरून नेला. तसेच पाच घरांमध्ये चोरी करण्याचा प्रयत्न केला. फिर्याद अशोक मल्लिकार्जुन गुजा (वय ६६व्यवसाय सेवानिवृत्त. रा. विरभद्रगल्ली करजगी) यांनी दिली.

फिर्यादी अशोक गुजा यांच्यासह करजगी गावातील सिध्दप्पा बिराजदार, महादेवी हलकट्टी, निलाबाई कल्पा नागणसूरे, काशीनाथ सिध्दप्पा गौडगाव वगैरे इतर लोकांचे घरी कडीकोयडा उचकटून कुलूप तोडून चोरी केली. तसेच काही ठिकाणी चोरीचा प्रयत्न केला. याची दक्षिण पोलीस स्टेशन मध्ये नोंद झाली आहे.

डोक्याचे ऑपरेशन करणे करिता फिर्यादी गुजा हे मुलीकडे गुलबर्गा येथे गेले होते. तेव्हा चोरट्याने संधी साधली. गुजा यांचे बंद घराचे दरवाजाचे कडीकोयंडा कशाच्या तरी सहाय्याने उचकटून कुलूप काढून घरातील लोखंडी कपाट तोडून रोख रक्कम १८ हजार रुपये, चार हजार रुपये किंमतीचा १०तोळे चांदीचे लक्ष्मीचा मुखवटा, व २४०० रुपयाचे ३० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या छोट्या वाट्या, चार हजार रुपयाचे १० तोळे चांदीचे ताट असे एकूण २८ हजार चारशे रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला.अधिक तपास पोलीस करत आहेत.

## दुधनीत गृहपयोगी साहित्यांचे किट वाटप

### सभापती प्रथमेश म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

✔ सुराज्य/अक्कलकोट

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रथमेश म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या हस्ते २०१ कुटूंबांना १६ प्रकारचे गृहोपयोगी साहित्यांचे कीट वाटप करण्यात आले.

दुधनी (ता.अक्कलकोट) येथे मागील आठवड्यात ढगफुटीसदृश्य पाऊस पडला होता.





यामध्ये कित्येक कुटुंब, व्यापारपेठ आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.ही बाब लक्षात घेऊन हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे होते.तर व्यासपीठावर कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, सभापती प्रथमेश म्हेत्रे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष परमशेट्टी, चंद्रकांत येगदी, राजशेखर दोषी, प्रशांत लोणी, गुरूशांत ढंगे, रामचंद्र गद्दी, राजू चव्हाण, गुरु हबशी, लोकेश राठोड, शोएब तडमुड, शंकर भांजी, सातलिंगप्पा परमशेट्टी, शिवराज गुळगोंडा, शिवशरण हबशी, शरणगौड पाटील, विश्वनाथ हडलगी,अशोक पादी,अशोक वरदळे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना सिध्दाराम म्हेत्रे म्हणाले की, सध्याच्या तरुण पिढीसमोर अनेक आव्हाने उभी आहेत.तरुणांनी जबाबदारी ओळखून आपली वाटचाल निश्चित केल्यास देशाची प्रगती शाश्वत होते. वाढदिवशी संकटातील कुटुंबांना किराणा किटचे वाटप करून प्रथमेश म्हेत्रे मित्र परिवाराने खऱ्या अर्थाने समाजसेवा केल्याचे म्हेत्रे यांनी नमूद केले. स्व.सातलिंगप्पा म्हेत्रे यांच्या विचारधारेला अनुसरून तरुणपिढीची वाटचाल ही निश्चितच गौरवास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी दुधनीतील व्यापारी असोसिएशन, मार्केट कमिटी, मातोश्री लक्ष्मीबाई प्रशाला, शांभवी फाऊंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी करडे यांनी केले. आभार गुरु हबसी यांनी मानले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



असली बोके तर ते आहेत!!

कल्याण

160-71-678

मेन बाजार

357-56-448

# जिल्ह्यातील ९ लाख मतदान ओळखपत्र आधारला लिंक

- सांगोला तालुका सर्वात आघाडीवर तर शहरात कमी प्रतिसाद
- उत्तर मतदारसंघात १५ हजार, मध्यममध्ये २१ हजार, दक्षिण ४८ हजार नोंदणी

✔ सुराज्य/सोलापूर

मतदान प्रक्रियेत पारदर्शकता असावी यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार यादी आधारकार्डशी पुढारी जोडण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात काम चालू आहे. सर्व तालुक्यात मोठ्या प्रमाणात शिबिर घेऊन जोडणी केली जात आहे. आता पर्यंत फक्त २५ टक्के काम झाले आहे. ३५ लाख ६२३ हजार ५५० मतदारांपैकी आज तागायत ९ लाख २५ हजार ८७१ मतदान कार्ड आधारची लिंक झाले आहे. या मोहिमेला आता गती दिली जाणार असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी भारत वाघमारे यांनी दिली.





१ ऑगस्ट २०२२ मतदार यादी आधारकार्डशी जोडण्याला सुरुवात झाली. जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा निवडणूक अधिकारी भारत वाघमारे यांची टीम मोठ जोमात काम करत आहे एका महिन्यात तहसीलदारांनी जिल्ह्यातील ९ लाख २५ हजार ८७१ इतके मतदार आधार कार्डशी जोडले आहेत. गेल्या काही दिवसापासून ओळख मोहीम आधार लिंक करण्याची जिल्हा प्रशासनाने तीव्र केली आहे. आधार लिंकची प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी प्रशासनाकडून विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून त्याला मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सध्याची गती पाहता काही महिन्यांतच आधार लिंकचे काम पूर्ण होईल, असे चित्र आहे.

आता पर्यंत केलेल्या काम २५ टक्के आहे. यामध्ये सांगोला विधानसभा मतदार संघातील काम आघाडीवर आहे या मतदार संघात ३ लाख ५ हजार ७९८ पैकी १ लाख ५५ हजार ७३२ मतदार कार्ड आधारची लिंक झाले आहे. सोलापूर शहरात तीन मतदार संघात काम संथ गतीने चालू आहे. शहर उत्तर मतदारसंघात १५ हजार ४४४ तर मध्य विधानसभा मतदारसंघात २१ हजार ३५३ , दक्षिण विधानसभा मतदार संघात ४८ हजार ६५९ मतदार कार्ड आधारशी लिंक झाले आहेत.

### • एका दिवसात २ लाख लिंक

निवडणूक शाखेच्या वतीने जिल्हयातील ३५४५ मतदान केंद्रावर मतदार याद्यातील तपशीलाशी आधारकार्ड जोडणीबाबतचे विशेष शिबीर घेण्यात आले याला मोठा प्रतिसाद मिळाला यामध्ये एका दिवसात झालेली नोंदणी अशी करमाळा (२६०२८) माढा (१८७८) बार्शी (३०४७०) (मोहोळ २४५८५) शहर उत्तर (३२७५) शहर मध्य (४७०६) अक्कलकोट (२२५७७) दक्षिण सोलापूर (१२७५०) पंढरपूर (१७४७४) सांगोला (२७१३०) माळशिरस (१७९३५) असे एका दिवसात २ लाख ५ हजार ७१८ जणांची मतदार कार्ड लिंक केले आहे.

### • मतदारसंघ निहाय झालेले लिंक

करमाळा (८९ हजार ३६०८) माढा (१ लाख ७ हजार ६३१), बार्शी (९१ हजार ८६२), मोहोळ (९१ हजार २७९८), उत्तर सोलापूर ( १५ हजार ८६२) दक्षिण सोलापूर (४८ हजार ६५९) अक्कलकोट (१ लाख १३ हजार ६८२), पंढरपुर (१ लाख ४ हजार ५९५), सांगोला (१ लाख ५५ हजार ७३२) माळशिरस (८१ हजार ३२६)

CMYK

# कांदा रडवणार

राज्यात कांद्याचा प्रश्न अजूनही गहन आहेच. सध्या पितृपक्ष पंधरवडा आहे तसेच पावसाळी वातावरणही आहे. त्यामुळे गृहिणींचे लक्ष कांद्याकडे नाही. केवळ हॉटेल आणि धाबा व्यवसायाच्या ठिकाणी कांदा भाव खातोय असे दिसते. स्थानिक बाजारात नाफेडने खरेदी केलेल्या कांदा विक्रीला विरोध होत आहे. अशी स्थिती असताना मुख्यमंत्री शिंदे यांनी नाफेडच्या खरेदीत आणखी दोन लाख मेट्रिक टन कांद्याची भर घालण्याची केंद्राला जी विनंती केली आहे, त्यातून विरोधाभास लक्षात येतो. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी नाफेडने आणखी दोन लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करावा, या शिंदे यांच्या मागणीने या प्रश्नाचा चेंडू केंद्र सरकारकडे टोलवण्याची परंपरा कायम राखली गेलीय, असे म्हणावे लागेल. केंद्र आणि राज्यात कोणाचेही सरकार असले तरी राजकीय पटलावर हा विषय असाच हाताळला जातो. महाविकास आघाडी सरकारने गडगडणाऱ्या दरासाठी केंद्रातील भाजप सरकारला जबाबदार धरण्यात कसर सोडली नव्हती. शिंदे-फडणवीस सरकारला मात्र असा पवित्रा घेणे शक्य नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पचनी न पडणारी मागणी रेटून या तिढ्यातून आपली मान सोडविण्याची नव्या सत्ताधाऱ्यांची धडपड दिसून येते. टळटळीत उन्हाळ्यात



हाती येणारा कांदा दिवाळीपर्यंत देशाची गरज भागवतो. नवीन लाल कांदा बाजारात येईपर्यंत चाळीत साठविलेल्या उन्हाळ कांद्यावर सर्वांची भिस्त असते. या काळात अनेकदा टंचाई निर्माण होऊन दर गगनाला भिडतात. यावर्षी विपुल उत्पादनाने प्रारंभापासून दर गडगडले, तसा राजकीय पटलावर हा विषय तापवला गेला. दर स्थिर राखण्यासाठी केंद्र सरकार नाफेडमार्फत कांदा खरेदी करते. नाफेडची ही खरेदीच यावेळी वादात सापडली. या योजनेत गतवर्षीच्या तुलनेत खरेदीचे उद्दिष्ट ५० हजार मेट्रिक टनने वाढून अडीच लाखावर नेण्यात आले होते. पण, नाफेडने जादा भाव न देता बाजार भावात खरेदी केली. ही खरेदी नेमकी कुठे आणि कशी झाली, असे प्रश्न उत्पादकांकडून वारंवार उपस्थित झाले. आता त्यांना वेगळीच चिंता आहे. आपल्या चाळीत कांदा पडून असताना नाफेडचा अडीच लाख मेट्रिक टन कांदा बाजारात आल्यास काय होईल, या विचाराने ते धास्तावले आहेत. त्यातून स्थानिक बाजारात नाफेडच्या विक्रीला विरोध होत आहे. त्याचवेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी नाफेडच्या खरेदीत आणखी दोन लाख मेट्रिक टनची भर घालण्याच्या केंद्राला केलेल्या विनंतीतून या विषयातील विरोधाभास लक्षात येतो. मुळात आधी खरेदी केलेल्या कांद्याची गुणवत्ता घसरल्याने तोच आतबट्ट्याचा व्यवहार ठरण्याच्या मार्गावर आहे. शेतकऱ्यांचा कांदा नव्याने खरेदीची शक्यता नाही. शिवाय, नाफेडच्या खरेदीने काहीही साध्य होणार नसल्याचे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे म्हणणे आहे. मुख्यमंत्र्यांनी मागणीच अशी केली की, ती बहुतेकांना मान्य नाही. त्यामुळे केंद्राने दखल घेतली काय आणि नाही घेतली काय, याची फारशी किंमत मोजावी लागणार नसल्याचे भाजपचे गृहीतक असावे. त्यांच्यासाठी इकडे आड तिकडे विहीर अशी स्थिती असल्याने मुख्यमंत्र्यांना पुढे करीत राज्यातील भाजप नेत्यांनी सूचक मौन बाळगले आहे. कांद्याचे राजकीय महत्त्व राष्ट्रवादी काँग्रेस अधिक जाणून आहे. या पक्षाचे नेते त्याचा पुरेपूर लाभ उठवितात. पण, कधीतरी त्यांची गाडी रुळावरून घसरते. अभ्यास न करताच मागण्या केल्या जातात. विरोधी पक्षनेते अजित पवारांनी केलेल्या कांद्यावरील निर्यात शुल्क कमी करण्याच्या मागणीने सत्ताधारी आणि शेतकरी बुचकळ्यात पडले. निर्यातीवर कुठलेही शुल्क नसताना दादांनी अशी मागणी करण्याचे कारण शोधले जात आहे. जुन्नर येथे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी कांदा निर्यातीवर नसलेली बंदी उठविण्याची मागणी करीत आपले अज्ञान प्रगट केले. गेल्या महिन्यात उत्पादकांनी एक दिवस कांदा विक्री बंद ठेवली होती. तेव्हा राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी घसरणीने शेतकऱ्यांमध्ये केंद्र शासनाच्या ध्येय धोरणांबाबत असंतोष वाढत असल्याकडे लक्ष वेधले होते. विरोधकांपैकी शिवसेनेचे सर्व लक्ष शिंदे गटाशी दोन हात करण्याकडे तर, काँग्रेसचे नेते बहुदा भारत जोडो यात्रेत मग्न असल्याने त्यांचे गडगडणाऱ्या कांद्याकडे दुर्लक्ष झाले. ग्रामीण भाग मनसेसाठी तसा दखलपात्रही नसल्याने तेही कांद्याच्या वांद्यात फारसे पडलेले नाहीत. चार महिन्यांपूर्वी म्हणजे राज्यात महाविकास आघाडीचे सरकार अस्तित्वात असताना नाशिक जिल्ह्यातील निफाड येथे भाजपच्या सहकार्याने रयत क्रांती संघटनेने कांदा परिषदेचे आयोजन केले होते. त्यातून नाफेड, पर्यायाने केंद्र सरकारच्या विरोधात उत्पादकांनी चालविलेल्या आंदोलनाची दिशा तत्कालीन महाविकास आघाडीकडे वळविण्याचे अटोकाट प्रयत्न झाले. आता हाच कांदा शिंदे-फडणवीस सरकारला रडवणार असे दिसते.

**जन्मदिन विशेष**

# देशहितवादी अमृतकुंभ!

पूर्वी देशात डावे म्हणजेच साम्यवादी प्रभावी होते. गांधींची प्रतिमा लावून राजकारण करणारी काँग्रेस गांधी विचारांना हरताळ फासत, सत्तेला चिकटून होती आणि डावे सर्व क्षेत्रात घुसून आपला अजेंडा राबवत होते. कधीकाळी काँग्रेसचेच अंग असलेले समाजवादी, राजकीय पक्षाचे लेबल न लावता काँग्रेसचीच री ओढणारे पुरोगामी आणि काँग्रेसच्या भ्रष्ट राजवटीचा राजाश्रय घेऊन डमरू वाजवणारे छोटे छोटे गट कार्यरत होते. वेळप्रसंगी अ चमू विरुद्ध ब चमू असा सामना रंगायचा. कालांतराने जनतेच्या लक्षात यायचे की अ आणि ब काही भिन्न नाहीत. त्यात सगळ्यात मोठा शाप होता घराणेशाहीचा. दाखवायला लोकशाहीच्या थोरवीचा डांगोरा पिटायचा आणि प्रत्यक्षात घराणेशाही राबवायची, ही मुळात काँग्रेसी पद्धत आणि धोरण. नेहरूंनंतर इंदिराजी, नंतर राजीवजी, नंतर सोनियाजी, नंतर राहुल किंवा प्रियांका. हे कशाचे द्योतक आहे? या घराण्याशिवाय संपूर्ण देशात काँग्रेसचे नेतृत्व करण्याची क्षमता असलेला एकही माईचा लाल जन्माला आलेला नाही का ? ज्यांनी ज्यांनी काँग्रेस नेतृत्वावर शंका घेतली त्यांना त्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. भूतकाळातही आणि वर्तमानातही. काँग्रेसच्याच घराणेशाहीचे मॉडेल राज्या राज्यात राबवले गेले. लालू प्रसाद यादव, मुलायमसिंह यादव, रामविलास पासवान, बाळासाहेब ठाकरे, फारुख अब्दुल्ला, एन. टी. रामाराव यांच्यासह प्रामुख्याने दक्षिणेतील व देशातील अनेक राज्यातील नेत्यांनी आपल्या घराण्याच्या हितालाच लोकशाहीचे हित मानले. प्रादेशिक अस्मिता जागवत अनेकांनी घराणेशाही बिनबोभाट राबवली. अल्पसंख्याकांचा अनुनय करत, भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालत ठिकठिकाणी कब्जा मिळवलेले हे गट वर्तमानात प्रचंड अस्वस्थ झाले आहेत. अनेकांची दुकानदारी संपुष्टात आली आहे. परिणामी आपापल्या विचारधारा गुंडाळून यांचा एक कंपू तयार झाला आहे.

मोदीजी पंतप्रधान झाले आणि त्यांनी प्रथम भ्रष्टाचारावर कडाडून हल्ला चढवला. 'न खाऊंगा न खाने दूंगा', या मोदीप्रतिज्ञेने घराणे अस्वस्थ झाले. पहिले बाप, नंतर मुलगा, नंतर त्याचा मुलगा यांची गुलामगिरी करणे म्हणजे लोकशाही नव्हे, हे जनतेला समजले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्वच्छ प्रतिमा, अफाट निर्णय क्षमता, भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात वाजत असलेला त्यांच्या कीर्तीचा डंका, त्यांच्या पाठीशी असलेली मजबूत पक्ष संघटना आणि भारतभर असलेली त्यांची लोकप्रियता ही विरोधकांची मोठी अडचण बनली आहे. जवळ जवळ दोन दशकानंतर भारतात स्पष्ट व निर्णायक बहुमत असलेले सरकार असल्याने देशहिताच्या निर्णयांना प्राधान्य देणारे हे सरकार असल्याचे भारताने अनुभवले आहे. मोदी देशासाठी करतात, हा विश्वास त्यांनी कमावला आहे. मोदी है तो मुमकिन है, हे सर्वसामान्यांचे मत आहे.

परिणामी आपला टिकाव लागावा किंवा आपले अस्तित्व कायम राहावे म्हणून मोदी विरोधकांजवळ केवळ एकमेव कार्यक्रम आहे आणि तो म्हणजे मोदींचे प्रतिमाभंजन!

> देव आणि दानवांचे समुद्रमंथन सुरू झाले की त्यातून हलाहल आणि अमृत दोन्ही बाहेर येतं. अमृताचा चषक पचवण्याआधी देवांचेच प्रतिनिधित्व करणाऱ्या कोणाला तरी हलाहल प्राशन करावं लागतं. भारताच्या वैचारिक मंथनात वर्तमानात देशहिताचा आग्रही विचार मांडणारा अमृतकुंभ नरेंद्र मोदी नावाच्या कर्मठ नेत्याच्या रूपाने हाती आला आहे. स्वाभाविकच या मंथनात देशोधडीला लागणारे स्वार्थी, भ्रष्ट व देशालाही डावावर लावणारे अखेरच्या फुत्कारासह तीव्र हलाहलाचा मारा करताहेत. पण हे हलाहल निष्प्रभ करणारे नेतृत्व केंद्रात विराजमान आहे. नरेंद्र मोदी नामक नायकामुळे आणि त्याला लाभलेल्या देवदुर्लभ कार्यकर्त्यांच्या बळावर हे हलाहल पचवून भारतावर अमृताचा शिडकावा करणारी अतुलनीय कामगिरी आपल्याला अनुभवायला मिळते आहे.

कुठले तरी निमित्त शोधायचे आणि मोदींचे सरकार दलित, शोषित, वंचित आणि अल्पसंख्याक विरोधात असल्याचा नरेटिव्ह तयार करायचा आणि धादांत खोटी आवई उठवायची, हा या कंपूचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. मोदींच्या कणखर नेतृत्वामुळे देशातील प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेस पक्षाच्या व प्रामुख्याने सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियांका वाड्रा यांच्या मर्यादा उघड झाल्या आहेत. घराणेशाहीमुळे आणि वारसाहक्काने पंतप्रधानपद आणि देशाची सत्ता आमचीच या समीकरणाला देशातील जनतेने मूठमाती दिली. राज्या राज्यातील प्रादेशिक पक्षांच्या नावाखाली घराणेशाही चालवणाऱ्या लोकांनाही जनतेने नाकारले. याचा परिणाम काय झाला तर विविध राज्यात एकमेकांची खुर्ची हिसकणारे, एकमेकांवर चढणारे छोटे - मोठे पक्ष आपापल्या विचारधारा गुंडाळून फक्त आणि फक्त मोदी विरोधासाठी एकत्र येत असल्याचा अनुभव आहे. मोदी जे बोलतील, जे करतील त्या विरोधात वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न करणे हा यांचा एकमेव अजेंडा. ही केविलवाणी स्थिती आहे. मोदी विरोधासाठी वेळप्रसंगी दहशतवाद्यांच्या बाजूने बोलणे, युद्धसदृश स्थितीत चीनच्या बाजूने बोलणे, विदेशात जाऊन भारत विरोधी वक्तव्य करण्यापर्यंतची पातळी या कंपूने सोडली आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे स्पष्ट बहुमत आहे. देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठ्या पक्षाचे ते नेतृत्व करतात. घटनेच्या चौकटीला आणि गाभ्याला हात न लावता ते देशहिताचे निर्णय करतात. मात्र, कंपू लोकशाही धोक्यात असल्याचा डांगोरा पिटतात. ज्यांनी या देशात आणीबाणी लादली, ज्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी केली, ज्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल झिडकारून हुकूमशाही लादली ते लोक सध्या लोकशाहीच्या नावाने अश्रू ढाळताना दिसतात. ज्यांनी आजवर अल्पसंख्याकांना केवळ व्होट बँक मानले ते अल्पसंख्याकांच्या भावना भडकवत भुई आपटताना दिसतात. ज्यांनी आजवर संविधानापेक्षा शरियाला मोठे मानले ते मुस्लीम महिलांना ट्रिपल तलाक पासून सुटका मिळत असताना संविधान खतरे मे, असल्याची आवई उठवताना दिसतात.

देशाचे नुकसान झाले तरी चालेल, जनतेचे हाल झाले तरी चालतील, जगात भारताची प्रतिमा खराब झाली तरी चालेल पण आमची गेलेली सत्ता कुठल्याही मार्गाने परत मिळवता यावी म्हणून मोदींच्या विरोधात भूमिका घेण्याची चढाओढ या डावे, काँग्रेसी, कथित पुरोगामी आणि बुद्धिजीवी यांच्यात लागली आहे. एकाएकी विशिष्ट लोकांना भारतात असुरक्षित वाटायला लागतं. लगेच काही सुतकी चेहरे गळे काढू लागतात. गावोगावी शाहीनबाग उभे केले जाते. गाईला माता मानणारा शेतकरी रस्त्यावर दूध ओतू शकतो का? पण रस्त्यांवर दुधाच्या नद्या वाहतील, एवढे दुधाचे टँकर पुरवले जातात. घामाने, कष्टाने हाती आलेले पीक रस्त्यावर फेकताना निवडक चेहरे समोर येतात. ज्यांच्या पिकाला भाव नाही आणि उपाशी मरण्याची भीती असते, अशा शेतकऱ्यांचे आंदोलन पंचतारांकित कसे असू शकते ? या देशाने शरद जोशी आणि महेंद्रसिंग टिकैत यांची आंदोलने बघितली आहेत. संपूर्ण देश आ वासून अशी आंदोलने पाहून थक्क होतो. एका रात्रीतून माओवाद्यांना साहित्यिक ठरवले जाते. भगतसिंह, राजगुरू, चंद्रशेखर आझादांसोबत माओवाद्यांच्या तस्वीरी आंदोलनात झळकतात. माओवादी म्हणून तुरुंगात असलेल्या आरोपींचा शेतकरी कायद्यांशी काय संबंध ? भारत तेरे तुकडे होंगे, म्हणणारी टुकडे टुकडे गँग देशभर फिरवली जाते. राहुल, सोनिया, केजरीवाल, अखिलेश यादव, शरद पवार, उद्धव ठाकरे असे विविध पक्षातील लोक एका सुरात बोलायला लागतात. सोईस्कररीत्या ईव्हीएम दोषी असते. प्रसार माध्यमांमध्ये बसलेले यांचे चेले चपाटे देखील एका सुरात मोदी विरोधात राग आळवत असतात.

देशाचे प्रश्न सोडवण्यासाठी मोदी संपूर्ण क्षमतेने लढत असतात आणि त्यांना बदनाम करणारे उघडे पडले की पुन्हा त्या कंपूच्या गमावलेल्या विश्वासार्हतेत पुन्हा भर पडते. एखाद्यावेळी दैनंदिन जीवनात अत्यावश्यक असलेल्या गरजांची पूर्ती करण्यात सरकारला पूर्ण यश आले नाही तरी जनतेचा विश्वास डळमळीत होत नाही. लोकांना खात्री असते की मोदीजी आहेत, तर यावर देखील मार्ग निघेलच. लोकांची वेळ देण्याची तयारी असते. मोदींनी आपल्या व्यवहारातून हे जनमत तयार केले आहे. विरोधकांच्या टीकेचा विषय असलेला मोदींचा कणखरपणा लोकांना अधिक भावतो. राजकारणात लोटांगण घेणाऱ्या नेतृत्वाऐवजी भारताला ताठ मानेने जगणं शिकवणारा नेता हीच मोदींची मोठी ओळख ठरते. भारतमातेच्या या थोर सुपुत्राला वाढदिवसानिमित्त कोटी कोटी शुभेच्छा !

**(लेखक हे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ते आहेत.)**
**- शिवराय कुलकर्णी.**

**टुडेज ब्लॉग**

**आज १७ सप्टेंबर, आजचा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र, मराठवाडा प्रांत हा पारतंत्र्यातच होता. पूर्वी मराठवाडा, हैदराबाद संस्थानात विलीन होता.**

हैदराबाद संस्थानावर निजाम ऊर उस्मान अली खान निजाम उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते. निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला होता. मात्र, हैदराबाद संस्थानातील जनता भारतात सामील होण्याच्या बाजूने होते. निजामाच्या संस्थानातून मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम आंदोलन सुरू झाले. हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या त्यावेळी दीड कोटीच्या वर होती. या संस्थानात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग होता.

मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रिझवी याने जनतेवर खूप अत्याचार केले. दुसऱ्या बाजूला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम वेगात सुरू होता. मराठवाडा मुक्ती संग्राम मराठवाड्यातील गावागावांत लढला जात होता. यात हजारो स्वातंत्र्य सैनिक पुढे आले.

स्वातंत्र्यसैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतरही निजाम शरण येत नाही उलट जनतेवरील अन्याय अत्याचार वाढतच आहे हे पाहून १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद संस्थानात पोलीस कारवाई सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. ते खूप धाडसी होते. त्यांच्या धाडसी आणि अचूक निर्णयाने जनतेस न्याय




मिळाला. मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे चार वाजता कारवाई सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सायंकाळपर्यंत तुळजापूर, परभणी ते मणीगड, कनेरगाव भारतीय फौजांनी सर केले.

चाळीसगावहून निघालेल्या फौजेने कन्नड, दौलताबाद काबीज केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून भारतीय फौजा पुढे निघाल्या. भारतीय फौजांपुढे निजामाच्या फौजेचे काही चालले नाही.

अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस याने शरणागती पत्करली. सेनाप्रमुखच शरण गेल्याने निजामही शरण आला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या गुलामीतून मुक्त झाले.

हैदराबाद मुक्ती संग्राम यशस्वी झाला. हैदराबाद संस्थानावर तिरंगा फडकला. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या अन्यायी राजवटी विरुद्धचा लढा मराठवाड्यातील जनतेने यशस्वी केला. तेंव्हापासून आजचा दिवस म्हणजे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणून साजरा केला जातो. मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली, त्या स्वातंत्र्यसैनिकांना मानाचा मुजरा. सर्व मराठवाडावासियांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

**बोधकथा**

## तीन माशांची गोष्ट



स्वच्छ पाणी असलेल्या एका तळ्याचा एक पाट एका नदीला मिळाला होता. त्या तळ्यात तीन मासे होते. त्यांपैकी एक मासा दूरदर्शी होता, दुसरा शहाणा व तिसरा अगदीच मूर्ख होता.


एके दिवशी दोन कोळी त्या तळ्याजवळ आले व आत पाहात असता त्यांना ते तीन लठ्ठ मासे दिसले. तेव्हा त्यांना धरण्यासाठी ते आपली जाळी आणायला गेले. त्या कोळ्यांचा बेत त्या माशांच्या लक्षात येताच ते बिचारे भिऊन गेले. त्यांपैकी जो दूरदर्शी मासा होता तो पाटातून पळून जाऊन नदीत शिरला.

थोड्या वेळाने ते कोळी आले व माशांनी पाटातून पळून जाऊ नये म्हणून त्यांनी पाटाचे तोंड बंद केले. ते पाहून त्या शहाण्या माशास आपण पळून न गेल्याबद्दल पश्चात्ताप झाला. पण तितक्यात त्याला एक युक्ती सुचली. मेल्यासारखा उताणा होऊन तो पाण्यावर तरंगू लागला. कोळ्यांनी त्याला वर काढले व तो मेला असे समजून त्याला पुन्हा पाण्यात फेकून दिले पण, तिसरा मूर्ख मासा मात्र पाण्याच्या तळाशी जाऊन इकडून तिकडे पळत राहिला व शेवटी बिचारा त्या जाळ्यात सापडून कोळ्याच्या हाती सापडला.

**तात्पर्य - एखादे संकट येणार असे दिसताच त्याच्या प्रतिकाराची तयारी न करणे मूर्खपणाचे आहे.**

**जन्म हा अखेरचा**

## परकायस्थल - १



ज्याने शिवज्ञान प्राप्त करून घेतले आहे, त्याची सर्व कर्मे दग्ध होऊन जातात, तो शिवतत्त्वावलंबी असतो. प्रत्येकाला कोणते ना कोणते तरी आलंबन (आधार) हवे असते.

खेळणे हा मुलांचा स्वभाव असतो. मूल चिखलाशीही खेळते आणि खेळण्यांशीही खेळते. चिखलात खेळणे चांगले नाही हे त्याला कळत नसते. तुम्हांला त्याचे चिखलात खेळणे बंद करायचे असेल तर त्याच्या हातात दुसरी आकर्षक, उत्तम वस्तू दिली पाहिले. मग ते चिखलाशी खेळणे सोडून चांगल्या वस्तुशी खेळू लागते.त्याप्रमाणे संसारात राहणारा जीवात्मा शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध या पाच विषयांशी सदैव खेळत असतो. त्याच्या मनाला विषय हेच आलंबन असतात. तो एकतर पाहत बसेल, ऐकत बसेल, कुणाशी बोलत बसेल, कुणाला स्पर्श करीत राहील किंवा काहीतरी हुंगत राहील. त्याच्या हातून हे विषय काढून घेतले तर तो रडत बसेल. त्याच्या हातून शब्द काढून घ्यायचा असेल तर त्याचा अशब्दाशी परिचय करून द्यावा लागेल. रूपावरून त्याची दृष्टी वळवायची असेल तर त्याला अरूपाचे दर्शन घडवायला हवे.

**(क्रमश:)**
**– काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

**जनमानस**

## नियमांचे पालन आवश्यक

अलीकडच्या काळात अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अपघातात कुटुंबातील व्यक्ती हे जग सोडून जातात तेव्हा त्या घराची काय अवस्था होत असेल? याचा विचार करणे सुद्धा कठीण वाटते. खराब रस्ते, खोदकाम सुरू असल्याने रस्त्याची दुरवस्था, वाहनांचा अतिवेग, नियमपालनांचा अभाव, नादुरुस्त वाहने, वाहनावरचा ताबा सुटणे अशी अनेक कारणे असू शकतात. कधीकधी कोणाच्या तरी चुकीने झालेल्या अपघातात निरपराध व्यक्तींना जीवाला मुकावे लागते.तेंव्हा यासंदर्भात खबरदारी व वाहतूक नियमांचे पालन आवश्यक आहे. याबाबत वारंवार प्रबोधन होऊनही त्याकडे दुर्लक्ष होते. अपघात झाल्यावर व व्यक्ती गेल्यावर त्या कुटुंबाची अवस्था काय होते, याचा विचार करून वाहने चालवली तर अपघात कमी होतील.

**- प्रफुल्लचंद्र काळे, नाशिक.**

# आधुनिक भारताचे स्थापत्यकार

नरेंद्र मोदी हे एक स्थापत्यकार म्हणून उदयाला आले आहेत. त्यांच्या अनेक प्रकल्पांनी भारताच्या भौगोलिक नकाशामध्ये स्थान मिळविले आहे. नवी दिल्लीच्या मध्यवर्ती भागातील सरकारी इमारतींची पुनर्रचना, नवीन संसद इमारतींची उभारणी, जगातील सर्वांत उंच पुतळा उभारणे किंवा केन आणि बेटवा नदीजोड प्रकल्पाला मान्यता असो, मोदींनी प्रतीकात्मक आणि प्रदर्शनीय मूल्य असलेल्या भव्य प्रकल्पांना नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यांच्या सरकारने देशाच्या पायाभूत सुविधेलाही प्रचंड पाठबळ पुरविले. द्रुतगती महामार्ग, अतिवेगवान रेल्वे प्रकल्प, वेगवान मालवाहतूक कॉरिडॉर, नवीन विमानतळे, महत्त्वाच्या नद्यांवर मोठे पूल बांधणे, अशा सर्व प्रकल्पांमुळे आपला विस्तीर्ण देश पूर्वी कधी नव्हता, तितका जवळ आला आहे.

अयोध्येत राममंदिर, वाराणसीत काशी विश्‍वनाथ धाम आणि हिमालयात चार धाम रस्ते प्रकल्प यांच्याद्वारे पंतप्रधान मोदी यांनी हिंदू मनांमध्येही आपले स्थान अढळ केले आहे. त्यांच्या सरकारच्या एकूण कामगिरीचे मूल्यमापन कसेही होवो, वास्तू उभारणीत मोदी हे एक वगळता, बाकी सर्व माजी पंतप्रधानांना मागे टाकणार, हे निश्‍चितच आहे.

देशाच्या आर्थिक व्यवस्थेमध्ये प्रत्येक नागरिक सहभागी व्हावा, यासाठी प्रधानमंत्री जनधन योजना आमूलाग्र बदल घडवून आणणारी ठरली. व्यापार सुलभ बनवण्यावर भर देण्याबरोबरच त्यांच्या 'मेक इन इंडिया' या आवाहनामुळे गुंतवणूकदार आणि उद्योजकांमध्ये अभूतपूर्व उत्साह संचारला. 'श्रम सुधारणा' आणि 'श्रमेव जयते' उपक्रमाअंतर्गत श्रम प्रतिष्ठेमुळे लघु आणि मध्यम उद्योगांमधील अनेक कामगारांचे सशक्तीकरण झाले.

जुलै २०१५ रोजी पंतप्रधानांनी 'डिजिटल इंडिया' अभियानाचा शुभारंभ केला. जनतेच्या जीवनमानात गुणात्मक बदल करण्यासाठी तंत्रज्ञानाचा कल्पक आणि अधिकाधिक वापर करणारी ही योजना आहे. महात्मा गांधींच्या जयंतीदिनी पंतप्रधानांनी 'स्वच्छ भारत अभियान' सुरू केले, जी संपूर्ण देशात स्वच्छतेसाठी एक लोक चळवळ ठरली आहे. प्रधानमंत्री जनधन योजना आर्थिक अस्पृश्यता नष्ट होण्याच्या उद्दिष्टाने ही जगातली सर्वांत मोठी 'बँकिंग फॉर ऑल' योजना सुरू करण्यात आली. 'नरेगा' सारख्या सर्व कल्याणकारी योजनांचे लाभ डायरेक्ट बेनिफिट ट्रान्स्फरच्या माध्यमातून नागरिकांच्या थेट बँक खात्यात जमा व्हावेत, हा हेतू त्यामागे होता. नरेंद्र मोदींच्या परराष्ट्रधोरणाशी संबंधित निर्णयांमुळे जागतिक व्यासपीठावर जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताची खरी क्षमता आणि भूमिका समोर आली आहे. अनेक देशांना भेटी दिल्यामुळे भारतात गुंतवणूक आकर्षित करण्यात ते यशस्वी ठरले. आखाती देशात ३४ वर्षांत दौरा करणारे ते पहिलेच भारतीय पंतप्रधान ठरले. आखाती देशांशी आर्थिक संबंध बळकट करण्यावर त्यांनी भर दिला. ऊर्जा, व्यापार, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रांशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण करारांवर या दौऱ्यादरम्यान स्वाक्षऱ्या झाल्या.



राष्ट्रीय सुरक्षा हा मोदी सरकारच्या सर्वोच्च प्राधान्याचा आणि कोणतीही तडजोड केली न जाणारा विषय आहे. सर्जिकल स्ट्राइक्स, एअर स्ट्राइक्स करून ते मोडीत काढलं. मोदी सरकारने राजकारण आणि राष्ट्रीय सुरक्षा यांचा एकमेकांशी असलेला संबंध पूर्णपणे तोडला आहे. संरक्षणविषयक उत्पादनात भारत आता स्वयंसिद्ध आहे. जग आता भारताकडे केवळ ग्रोथ इंजीन म्हणून पाहत नाही, तर जागतिक आर्थिक बाबतींत मोठा प्रभाव असलेला देश म्हणून भारताकडे पाहिलं जातं. भारतासारख्या देशात मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात वृद्धी करण्याचं आव्हान दिवसेंदिवस अवघडच होत चाललं आहे, असं बोललं जात होतं. मात्र संरक्षण, औषध आणि इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रातल्या उत्पादनात भारताने अलीकडे केलेल्या कामगिरीमुळे या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळाली असून, ते सारे सिद्धांत खोटे ठरवले आहे. कारण संपूर्ण जगावर कोव्हिड-१९ सारखी अचानक अकल्पित संकट आलं, तेव्हा जगभरातल्या अर्थव्यवस्थांवर काळे ढग दाटले. ते दृश्य धडकी भरवणारं होतं आणि भविष्य अनिश्चित होतं. सूर्य पुन्हा कधी उगवेल आणि हे सावट कधी सरेल, हा एकमेव प्रश्न सर्वत्र विचारला जात होता. पण अशा परिस्थितीत संपूर्ण जगाला कोरोना लस पुरविण्याचे काम भारताने केले. देश एका आश्वासक नेतृत्वाच्या साथीने भविष्यातील जागतिक शक्ती म्हणून वाटचाल करीत आहे. याची खात्री पटावी असेच हे चित्र. मोदी यांच्या संकल्पातील भारतात महिला, मजूर, शेतकरी, कष्टकरी, उद्योग, पाणी, जमीन, निसर्ग आणि अगदी वन्यजिवांच्या सुखी जगण्याचेही स्वप्न जनतेला दिसले आणि त्याच्या पूर्ततेसाठी सरकारच्या ध्यासपूर्ण वाटचालीचे पुरावेही जनतेने अनुभवले. अशी ही व्यक्ती, साहस, करुणा आणि विश्वासाची साकार मूर्ती, स्थापत्यकार आहे. अशा या महान देशाच्या महान पंतप्रधानांना वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा.....

**- प्रा. तात्यासाहेब काटकर, अकलूज.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# ६ महिन्यात दुधातील ‘भ्रष्टाचाराला फुटली उकळी’

✔ सुराज्य/सोलापूर

**जिल्ह्यातील बळीराजा दुभत्या जनावरांचा सांभाळ करताना, दुधाचा थेंब ना थेंब डेअरीला घालवून प्रपंचाला चार पैसे लागण्यासाठी कासावीस करतोय. प्रसंगी गायी - म्हशींच्या वासरांच्या आणि घरातील पोराबाळांच्या तोंडचे ‘अमृत‘ काढून तो दूध संघाच्या डेअऱ्यांना घालतोय. तथापि, दुसरीकडे दूध संघाचे काही कारभारी आणि नोकरशहांकडून मात्र ‘लुच्चेगिरीं‘ने कमी प्रतिचे दूध संघाला घालून क्लृप्त्या लढवत मलिदा लाटला जातोय. पाचही बोटे तुपात ठेवण्याचा प्रकार सुरु आहे. याच प्रकारातून मागच्या ६ महिन्यात दुधामधील भ्रष्टाचाराला उकळी फुटत गेली आणि कारभारी व नोकरशहांनी मिळून अंदाजे ७ कोटींचे घबाड खिशात घातले. शेतकऱ्यांच्या मालकीच्या दूध संघाला कर्जाच्या खाईत लोटण्याबरोबरच, अधिक अडचणीच्या मार्गांवर नेल्याचा प्रकार समोर आला आहे. याच्या चौकशीची मागणी विरवडे बुद्रुकमधील एका सह. दूध संस्थेने विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) पुणे विभाग, पुणे व्दारा-प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी यांच्याकडे केली आहे.**

- लुच्चेगिरीवाल्यांकडून ७ कोटींचा मलिदा घशात
- कमी प्रतिच्या २० हजार लिटर दुधावर संघाला रोज घाटा
- वाढवून गुण प्रत देण्यात संघाला महिन्याला कोटींचा चुना
- दूध संघात काही कारभारी तसेच अधिकाऱ्यांची 'मॅनेज' फिल्डिंग



भाकड दूध संघातील दुधाचा मलिदा.....

शिवाजी भोसले




अमृताचा एक थेंब ना थेंब वाढवण्याचा बळीराजाचा प्रतिकूल परिस्थितीशी चाललेला संघर्ष आणि दुसऱ्या बाजूला आयत्या ताकावरील लोणी काढण्याचा लुच्चेगिरीवाल्यांचा प्रताप. हे भाकड दूध संघातील विदारक दृष्य आहे. मोहोळ तालुक्यातील एका सह. दूध संस्थेने जिल्हा दूध संघाकडं सद्य स्थितीत दररोज अंदाजे ३५ हजार लिटर दूध संकलीत होते. त्यापेकी १२ ते १३ हजार लिटर दुधाच्या पिशवींद्वारे विक्री होते. उर्वरित साधारण २० ते २१ हजार लिटर दूध खासगी दूध संस्थांना विकलं जाते. दूध संघाच्या संस्थांकडून दूध घेवून, ते मोठ्या खासगी दूध संस्थांना विकण्यात प्रतिलिटर २ ते ३ रूपयांचा घाटा दूध संघाला येत असल्याची ओरड आहे.

कमी प्रतिचे दूध संघात आल्यावर त्यामध्ये एका खासगी संस्थेकडून घेतलेली दूध पावडर त्यात मिसळून दुधाची प्रत वाढवत विक्रीसाठी पिशवी बंद दूध तयार केले जाते. एका संस्थेची खरेदी केली जात असलेली दूध पावडर तरी चांगल्या प्रतीची आहे का? यावर विरवडे बुद्रूकच्या तक्रारदार संस्थेने प्रश्नचिन्ह उपस्थित करून चौकशीची मागणी केली आहे. दररोज सुमारे २० हजार लिटर दुधावर ८० हजार रूपयांपर्यंत आलेल्या घाट्याचा महिन्याचा हिशोब १ कोटी ८० लाखांवर गेला आहे. मागच्या ६ महिन्यातील ही रक्कम अंदाजे ७ कोटींपेक्षा जास्त होते. दूध संघावरील प्रशासक जावून कारभारी आले, तदनंतर पुढच्या सहा महिन्यांच्या काळात हा प्रकार घडला आहे. संघाचे काही संचालक व त्याशिवाय दूध संघामधील मलिदा लाटून गबरगंड झालेले काही वशिलेबहाद्दर डेअरीवाले यांच्या संस्थांचे कमी प्रतिचे दूध घ्यायचे, त्याबदल्यात त्यांना मात्र चांगल्या प्रतिच्या दुधाचे पेमेंट करायचे. दुसऱ्या बाजूला इतर खासगी दूध संस्थांना दूध विकण्यात आलेला तोटा सहन करायचा या सर्च प्रकरातून दूध संघाला चुना लागत आहे. काही संचालक तसेच मॅनेज धोरण स्विकारललेले काही वशिलेबाज डेअरीवाले यांच्या संस्थांचे साधारण कमी प्रतिचे दूध स्विकारून त्यांना चांगल्या प्रतिच्या दुधाच्या पावत्या दिल्या जातात. तसे तर ३.५ / ८.५ या प्रतिचे दूध स्विकारण्यात यावे असा सरकारी निकष आहे. पण हा निकष केवळ सामान्य पशुपालकांच्या दुधाला लावला जातोय.

### इथेच घोडे पेंड खातेय

केगाव दूध केंद्रात दूध आल्यानंतर त्याची प्रत तपासण्यासाठी येते. तीन केमिस्ट आहेत. दुधाची प्रत तपासून त्यासंबंधीचा दूध घातलेल्या प्रत्येक संस्थेचा दोन्ही वेळेचे वस्तुनिष्ठ आणि खरेखुरे रिपोर्ट देणे या केमिस्टांवर बंधनकारक आहे. पण येथेच घोडे पेंड खातेय. काही संस्थांच्या दुधाची प्रत कमी असतानाही ती चांगली असल्याचे कागद येतेच,असे केमिस्ट रंगतातहेत. विशेषत्वे, केमिस्ट नंतरची दूध प्रति संदर्भातील जबाबदारी असणारे सहा. दूध संकलन अधिकारी, दूध संकलन अधिकारी, केंद्र इनचार्ज ते व्यवस्थापक या साखळतील सर्वांना कमी प्रतीच्या दुधाचे प्रकरण माहित आहे. केमीस्टबरोबर साखळीतील हे सगळे त्या प्रकाराला जबाबदार ठरतात. केमीस्टससह साखळतील सगळे मनेज आहेत की, त्यांच्यावर दबाव टाकून घोड्याला पेंड चारली जातेय?

### खुद्द अध्यक्षांनीच तोफ डागत काढली इज्जत तुम्ही दूध नव्हे, संघाला पाणी घालता

दूध संघाच्या संचालकांची १४ तारेखाला बैठक झाली, तीत कमी प्रतिच्या दुधाचा विषय निघाला होता, यावेळी संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी कमी प्रतिचे दूध संघाला घालणारे संस्थेचे एक पदाधिकारी आणि एक संचालक अशा दोघांवर तोफ डागली. तुम्ही संघाला दूध नव्हे, तर पाणी घालता या शब्दात थेट तोफ डागून अध्यक्ष शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. तुम्ही संघाला दूध आणू नका असे खडे बोलही त्यांनी सुनावले. काही संचालकाच्या खाबुगिरीचा भांडाफोड थेट सभेत सर्वांसमक्ष झाला.

### त्या कर्मचाऱ्याचा दाबला आवाज

काही ठराविक संचालकांच्या आणि काही वशिलेबहाद्दरांच्या दूध संस्थांचे कमी प्रतीचे दूध घेवून त्यांना चांगल्या गुणप्रतिच्या पावत्या देवून मलिदा घशात घालत अत्यंत अडचणीमधील दूध संघाला चुना लावून संघाला अधिकच अडचणीच्या खाईत घालण्याच्या प्रकाराविषयीची तक्रार केगाव केंद्रातील एका कर्मचाऱ्योने लेखी स्वरूपात दिली. संबंधीत प्रकार थांबवण्याची मागणी प्रांजळपणाने केली होती. पण या कर्मचाऱ्याच्या पत्राला केराची टोपली दाखवून उलट या कर्मचाऱ्यावर दबाव आणून त्याचाच आवाज दाबण्याचा प्रकार दूध संघात झाल्याचे सांगण्यात येते.

## विद्यापीठाच्या युवा महोत्सवासाठी सांस्कृतिक प्रमुखांची कार्यशाळा

✔ सुराज्य/सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अठराव्या युवा महोत्सवासाठी संलग्नित महाविद्यालयाच्या सर्व सांस्कृतिक प्रमुखांची एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. उद्या (शनिवारी) सकाळी ११ वाजता हरिभाई देवकरण प्रशालेजवळील के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कॉलेज येथे कार्यशाळा होणार असल्याची माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ कळवणे यांनी दिली.

या कार्यशाळेचे उद्घाटन शनिवारी सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी कुलसचिव श्रीमती योगिनी घारे, मंगळवेढेकर कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रमोद वैद्य यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्यानंतर दुपारी १२ वाजता औरंगाबाद येथील प्रा. अनिलकुमार साळवे यांचे नाट्य विभाग या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. कोल्हापूरचे डॉ. जयभीम शिंदे यांचेही यावेळी संगीत विभागावर मार्गदर्शन होईल. दुपारी ३ वाजता पुण्याच्या पायल जाधव यांचे नृत्य विभागावर तसेच पुणे येथीलच प्रा. स्वामीराज भिसे यांचे ललित व वांग्मय विषयावर मार्गदर्शन होणार आहे. त्यानंतर चर्चासत्र होईल. सायंकाळी ५ वाजता समारोपाचा सत्र होईल.




प्र कुलगुरू डॉ. राजेश गादेवार यांच्या अध्यक्षतेखाली समारोप सत्र होईल. यावेळी वित्त व लेखाधिकारी सी. ए. श्रेणीक शाह यांची प्रमुख उपस्थिती असेल. या कार्यशाळेसाठी संलग्नित महाविद्यालयातील सर्व सांस्कृतिक प्रमुखांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## प्रा.कलशेट्टी यांची इतिहास परीषदेच्या राज्य कार्यकारिणी सदस्य पदी निवड

✔ **सोलापूर** : महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय इतिहास परिषदेच्या राज्य कार्यकारणी सदस्य पदी प्रा.स्वामीनाथ कलशेट्टी यांची निवड करण्यात आली. प्रा. कलशेट्टी हे श्री. बृहन्मठ होटगी शैक्षणिक संस्थेतील श्रीक्षेत्र धोत्री येथील श्री. भगवती गौरीमाता प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.



अध्यक्ष प्रा. रंगनाथ कांगणे, कार्याध्यक्ष श्री. सुनील शिंदे, उपाध्यक्षा प्रा. स्मिता जयकर, सचिव. डॉ. प्रा. नितीन देव-तळे, कोषाध्यक्ष प्रा. चौधरी या पदाधिकाऱ्यांकडून प्राध्यापक कलशेट्टी यांना निवडीचे पत्र देण्यात आले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष प्रा. संजय जाधव, प्रा. नरेश पवार, प्रा. श्रीधर सगेल, प्रा. प्रशांत नागुरे, प्रा. सतीश नागणे, प्रा. मीनाक्षी मेडपल्ली आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. कलशेट्टी यांच्या निवडीबद्दल श्री. श्री. श्री. १००८ ज्ञानसिंहास-नाधीश्वर डॉ. मल्लिकार्जुन विश्व-ाराद्य शिवाचार्य महास्वामी काशी महापीठ व बृहन्मठ होटगी संस्थेचे नूतन उत्तराधिकारी परमपूज्य श्री. ष. ब्र. चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामी यांनी आशीर्वाद दिले.

## निधन वृत्त

### शिवकर्णी आडके



✔ **दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तूर येथील प्रतिष्ठित व्यक्ती शिवकर्णी धोंडप्पा आडके (वय-८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. उद्या शुक्रवार दि.१६ रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्यात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.ते हत्तूरच्या सोमेश्वर प्रशालेचे माजी चेअरमन होते.

### सुभाष उदगीरकर




✔ **सोलापूर** : सुभाष रामचंद्र उदगीरकर वय ७८यांचे वृध्दपकाळाने दुःख निधन वालचंदनगर ता.इंदापूर, जि.पुणे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, नातवंडे आसा परीवार आहे. वालचंदनगर इंडस्ट्रीज कंपनीत सिनिअर जॉब इन्स्पेक्टर या पदावरुन सेवा निवृत्त झाले होते, दहीगांव ता.माळशिरस येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील शिक्षक मनोज उदगिरकर यांचें ते वडील होते.

महाराष्ट्र शासन | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव



श्री. नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान

राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता
सेवा पंधरवडा
(१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर)



राष्ट्रपिता
महात्मा गांधी

नागरिकांच्या प्रलंबित अर्जांचा स्थानिक पातळीवर निपटारा करण्यासाठी
विशेष मोहीम





१० सप्टेंबर पर्यंतच्या अर्जांचा निपटारा
आपले सरकार, नागरी सेवा केंद्र व इतर वेबपोर्टलवरील प्रलंबित अर्जांचा जलदगतीने निपटारा.

याशिवाय विविध विभागांच्या खालील १४ सेवांचा समावेश

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नवीन शासन निर्णयानुसार मदत निधीचे वितरण | ९) | प्रलंबित घरगुती विद्युत जोडणीस मंजुरी |
| २) | पंतप्रधान किसान सन्मान निधीचा प्रलंबित पात्र लाभार्थ्यांना लाभ | १०) | मालमत्ता हस्तांतरणानंतर विद्युत जोडणीमध्ये नवीन मालमत्ताधारकाचे नाव. |
| ३) | फेरफार नोंदींचा निपटारा | ११) | बिरसा मुंडा कृषी क्रांती योजने अंतर्गत सिंचन विहिरीकरिता अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी |
| ४) | शिधापत्रिकांचे वितरण | | |
| ५) | विवाह नोंदणी प्रमाणपत्र | १२) | अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना प्रलंबित वन हक्क पट्टे मंजूर करणे |
| ६) | मालमत्ता हस्तांतरण नोंद | १३) | दिव्यांगांना प्रमाणपत्र |
| ७) | नव्याने नळ जोडणी | १४) | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र |
| ८) | मालमत्ता कराची आकारणी करणे व मागणी पत्र | टीप : सेवा पंधरवड्याचे आयोजन करताना ज्या भागात निवडणूक आचारसंहिता लागू असेल तेथे आचारसंहितेचे पालन करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.(सा.प्र.वि. दि. १२/९/२०२२ रोजीचे पत्र) | |

सेवा | कर्तव्य | साधना

श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# सोलापुरात मराठा भवन व वसतिगृह बांधण्यास महसूलमंत्री सकारात्मक

सुराज्य/अकलूज

**राज्यात आरक्षणासाठी मराठा समाजाचे भव्य असे मोर्चे निघाले होते. त्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यात 'मराठा भवन' उभारण्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. सोलापूर जिल्ह्यातूनही तसा प्रस्ताव दोन वेळा गेलेला आहे, तो मंजूरही आहे. परंतु काम प्रलंबित आहे. ते काम सुरू व्हावे यासाठी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची भेट घेऊन निवेदन दिले. यासंदर्भात महसूलमंत्र्यांनी सकारात्मकता दाखवल्याचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितले.**

## आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा पाठपुरावा



सकल मराठा समाजाच्या झालेल्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात मराठा भवन व वसतिगृह बांधण्यासाठी दोन एकर शासकिय जागा व पाच कोटी रुपये बांधकामासाठी निधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. तशी घोषणा त्यांनी विधिमंडळात देखील केली होती.

त्यानुसार सकल मराठा समाज सोलापूर जिल्ह्याच्यावतीने जिल्हाधिकारी सोलापूर यांनी मराठा भवन व वसतिगृह बांधण्यासंदर्भातील प्रस्ताव पाठवला होता.

शासनाने तो प्रस्ताव मंजूर केला आहे. परंतु कार्यवाही झाली नाही. त्यानंतर सन २०२१ मध्ये पुनर्प्रस्ताव शासनाकडे पाठवला गेला आहे तोही अद्याप प्रलंबित आहे. हा प्रश्न मार्गी लागण्यासाठी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी गुरुवारी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची भेट घेऊन त्यांच्याशी यासंदर्भात चर्चा केली व लेखी निवेदन देखील दिले. हे काम कोठे अडले आहे याची तात्काळ माहिती घेतली जाईल. तशा सूचना त्यांनी प्रशासनास दिल्या आहेत.

सोलापूर येथील मराठा भवन व वसतिगृहाचे काम मार्गी लावण्यासाठी तातडीने पावले उचलली जातील, असा शब्द देखील महसूल मंत्री विखे-पाटील यांनी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांना दिला आहे



## सरकार विरुद्ध युवा सेनेची निषेध स्वाक्षरी मोहीम

सुराज्य/सोलापूर : वेदांत आणि फॉक्सकॉन यांचा संयुक्तरीत्या महाराष्ट्रात येऊ घातलेला प्रकल्प खोके सरकारच्या हलगर्जीपणामुळे गुजरातमध्ये गेल्यामुळे १ लाख तरुणांचा रोजगार गेला. या निषेधार्थ युवासेनेतर्फे जिल्हाप्रमुख बालाजी चौगुले यांच्या नेतृत्वाखाली संगमेश्वर कॉलेज, सात रस्ता येथे स्वाक्षरी निषेध मोहीम घेण्यात आली. यावेळी लहुजी गायकवाड, युवती सेना जिल्हाप्रमुख पूजा खंदारे, युवासेना उपजिल्हाप्रमुख अमर बोडा, ऋषिकेश धाराशिव, तालुका समन्वयक प्रसाद नीळ, तुषार आवताडे, उपशहरप्रमुख विजय मोटे, शहर समन्वयक प्रथमेश तपासे, सोमनाथ भालेकर, युवासेना उपशहरप्रमुख राम कांबळे, अभिषेक सूळ, यश सुरवसे, आदित्य पांडे, सुयोग पवार, दौलत बसरगी, वैभव लोंढे, राहुल पवार, संतोष भगरे, परशुराम वाघमारे व युवासैनिक उपस्थित होते. शिंदे-फडणवीस सरकार आल्यापासून राज्यात सर्व निर्णय एकतर्फी घेतले जात आहेत. ठाकरे सरकारचे सर्व निर्णय जाणीवपूर्वक रद्द केले जात आहेत. वेदांत आणि फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेल्याने १ लाख तरुणांचा रोजगार गेला आहे. याचा निषेध म्हणून ही मोहीम घेतल्याचे चौगुले यांनी सांगितले.



## प्रभाग क्र.१५ मध्ये विकासकामांचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर : सोलापूर प्रभाग क्र. १५ मध्ये आमदार प्रणिती शिंदे यांच्या निधीतून नगरसेविका वैष्णवी अंबादास करगुळे यांच्या प्रयत्नातून युवक मंच सभा मंडप भूमिपूजन करण्यात आले. यावेळी नगरसेविका वैष्णवी करगुळे, मोची समाजाचे माजी अध्यक्ष बसवराज म्हेत्रे, शिवराम जेगले, अंबादास करगुळे, रामकृष्ण पल्ले, नागनाथ म्हेत्रे, सुशीलकुमार म्हेत्रे, महामुनी होसमनी, सायबण्णा तुपदोळकर, प्रकाश जेगले, नागेश अलझेंडे, सायबण्णा करगुळे कृष्णा होसमनी, मारू करगुळे व मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## दोडका, काकडी, गवार महागली

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शुक्रवार, १६ सप्टेंबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार दोडका, काकडी, गवार महागली आहे. त्यांचे दर प्रतिक्विंटल हजार ते दोन हजार रूपयेने वाढले. त्याच बरोबर कोबी, ढोवळी मिरची, कोथिंबीर, फ्लॉवर, चाकवत, मेथी भाजी, ज्वारी, पालक यांचेही दर प्रतिक्विंटल १०० ते हजार रूपयेने वाढले. तर कारली, वांगी, लसूण, कांदा पात, कांदा, बटाटा, तांदूळ यांचे दर स्थिर राहिले.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं.) | जास्तीत जास्त दर (क्विं.) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ५,००० | ८,५०० | ६,५०० |
| कारली | १,००० | २,५०० | २,००० |
| वांगी | ८०० | ४,००० | २,००० |
| कोबी | ४५० | १,००० | ८०० |
| ढोवळी मिरची | ४०० | १,५०० | ८०० |
| गाजर | १,५०० | ३,१०० | २,५०० |
| गवार | ४,००० | ६,६०० | ५,००० |
| कोथिंबीर | ५०० | १,७०० | १,००० |
| काकडी | १,२०० | ७,००० | ३,००० |
| फ्लॉवर | ७२० | १,६०० | १,०४० |
| लसूण | १,००० | ३,१०० | १,५०० |
| घेवडा | ३,५०० | ५,००० | ४,००० |
| हिरवी मिरची | १,५०० | २,५०० | २,००० |
| अंबाडी भाजी | ४०० | ४०० | ४०० |
| कांदा पात | ४०० | ७०० | ६०० |
| बटाटा | ८०० | १,८५० | ९०० |
| राजगिरा | ३०० | ७०० | ६०० |
| लिंबू | १,५०० | ५,८०० | ३,५०० |
| तांदूळ | ३,००५ | ६,३१० | ३,७६० |
| शेपू | ३०० | ८०० | ६०० |
| ज्वारी | २,५६८ | २,६६५ | २,६३५ |
| पालक | ५०० | ७०० | ६०० |
| टोमॅटो | २०० | १,००० | ५०० |
| गहू | २,३०० | ३,२८५ | २,६६५ |

## पंढरपूरला पुराचा धोका

सुराज्य/पंढरपूर

पुणे जिल्ह्यात होत असलेल्या मुसळधार पाऊस सुरू आहे भीमा खोऱ्यात आणि उजनी जलाशयावर मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असल्यामुळे उजनी धरणात येणारी आवक मोठ्या प्रमाणावर येत आहे त्यामुळे उजनी धरणातून भीमा नदीच्या पात्रामध्ये ९० हजार क्युसेक्स पाणी सोडण्यात येत आहे तर वीर धरणातून ४३ हजार क्युसेक्स पाणी नीरा नदीत सोडण्यात येत आहे त्यामुळे पंढरपूरला पुराचा धोका निर्माण झाला आहे.

उजनी धरणातून शुक्रवारी सायंकाळी ९० हजार क्युसेकने पाणी सोडले जात होते. वीज निर्मितीसह हा विसर्ग ९१ हजार ६०० क्युसेकचा इतका होता. तर निरा नदीवरील वीर मधून ४३ हजार क्युसेकने पाणी सोडले जात होते. या दोन्ही धरणांमधून मिळून जवळपास १ लाख ३४ हजार क्युसेकने पाणी सोडले जात आहे. पावसाच्या प्रमाणात हे विसर्ग कमी जास्त होवू शकतात. दरम्यान उजनी धरणातून पाण्याचा विसर्ग सकाळपासून झपाट्याने वाढविले गेले आहेत. भीमा खोऱ्यात पावसाचा जोर असून पुणे परिसरात पर्जन्यराजा जोरदार बरसत असल्याने खडकवासला धरणातून ३० हजार तर मुळशीतून २६ हजार यासह चासकमान प्रकल्पातून ९ हजार , घोडमधून ११ हजार व अन्य धरणांमधूनही पाणी सोडले जात होते. यामुळे उजनीची आवक ही येत्या काही तासात वाढणार आहे. उजनी धरण हे सकाळी १०८ टक्के उपयुक्त पातळीत भरले होते. यात आता पाणी साठवण करण्यासाठी जागा नसल्याने वरील धरणांमधून विसर्ग वाढताच उजनीतूनही मोठ्या प्रमाणात भीमा नदीत पाणी सोडले जात आहे. निरा खोऱ्यातील सर्वच धरणांवर पावसाचा जोर कायम असून तेथील सर्व प्रकल्प क्षमतेने भरले आहेत. ४८ टीएमसी हून अधिक तेथे पाणीसाठा असल्याने वीर चे दरवाजे उघडण्यात आले आहेत. सायंकाळी पाच वाजता ४३ हजार क्युसेकचा विसर्ग सोडला जात होता.



भाटघर व देवघर धरणातून पाणी सोडले जात असून ते वीरमध्ये येते व हा प्रकल्प शंभर टक्के भरला आहे. आता उजनी व वीर च्या पाण्याने निरा व भीमा नदी दुथडी भरून वाहात आहेत. नदीकाठी सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून नृसिंहपूर संगमच्या पुढे सोलापूर जिल्ह्यात भीमा आता पूरसदृश्य स्थितीत वाहण्यास सुरूवात होणार आहे. जवळपास सव्वा लाखाच्या आसपास विसर्ग नदीत मिळण्याची शक्यता आहे. यामुळे नदीकाठच्या शेतांमध्ये पाणी शिरू शकते. सध्या भीमाकाठच्या शेतकऱ्यांचे लक्ष उजनी व वीरच्या विसर्गांकडे आहे. पंढरपूरमध्ये ही नदीकाठी असणाऱ्या वसाहतींमध्ये एक लाख दहा हजार क्युसेकचा विसर्ग मिळाल्यास पाणी शिरते. हे पाहता नगरपरिषद व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वसाहतींमधील नागरिकांना सुरक्षितस्थळी पोहोचविण्यास सुरूवात केली आहे.

### भीमाकाठी अतिदक्षता

सध्या उजनी व वीरमधून सोडण्यात येणाऱ्या पाण्यात सतत वाढ होत असल्याने नद्यांची पाणी पातळी वाढत आहे. भीमेला पूरसदृश्य स्थिती निर्माण होणार असल्याने पंढरपूरसारखी शहर व सखल भागात जास्त खबरदारी घेतली जात आहे. नदीकाठावरील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पंढरपूरमध्ये प्रशासनाने खबरदारीच्या उपाय योजना आखल्या आहेत. संभाव्य पाणी येवू शकणाऱ्या वसाहती रिकाम्या केल्या जात आहेत. यासाठी नगरपरिषदेचे कर्मचारी व अधिकारी काम करत आहेत.

## पालिका कर्मचाऱ्यांसाठी लसीकरण शिबिर

सुराज्य/सोलापूर

राज्यात सर्वत्र स्वाईन फ्लूचे रुग्ण वाढत असून सोलापूर महानगरपालिकेतर्फे महापालिकेतील कर्मचाऱ्यांसाठी कोविड कंट्रोल रूम येथे स्वाईन फ्लू लसीकरणाचे शिबिर आयोजित करण्यात आलेले होते. या शिबिराचे उद्घाटन महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांच्या हस्ते करण्यात आले.

शहरात आजपर्यंत एकूण ७५ स्वाईन फ्लूचे रुग्ण आढळलेले असून यापैकी एका रुग्णाचा मृत्यू झालेला आहे. आजपर्यंत गरोदर माता, सहव्याधी असलेले नागरिक तसेच आरोग्य सेवा देणारे कर्मचारी अशा एकूण २२०० लोकांचे लसीकरण करण्यात आलेले आहे. ही लस महापालिका कार्यक्षेत्रातील १५ नागरी आरोग्य केंद्रे व ७ प्रसूती ग्रह यांच्याकडे मोफत उपलब्ध आहे. तरी सर्व नागरिकांनी लस घ्यावी, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. या शिबिरात एकूण ८६ कर्मचाऱ्यांचे लसीकरण करण्यात आले. यात प्रामुख्याने ५० वर्षावरील ५७ कर्मचाऱ्यांना लस देण्यात आली. शिबिराच्या यशस्वितेसाठी आरोग्य अधिकारी डॉ. बसवराज लोहारे, डॉ. शिरशेट्टी आणि कुटुंब कल्याण कार्यालयाकडील सर्व कर्मचारी आणि देगाव नागरी आरोग्य केंद्राकडील वैद्यकीय अधिकारी डॉ. महेंद्रकर व कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

## लम्पी आजारासंदर्भात ८ हजार लसिकरण



सुराज्य/सोलापूर

कोरोनाच्या साथीमध्ये ज्या पद्धतीने काम केले त्या पद्धतीने काम करावे लागेल. सर्व विभागाने लंपी बाबत जनजागृती करण्याची गरज आहे. कोणीही घाबरून जाऊ नये, पशुला आजार झाला म्हणजे माणसाला आजार होणार नाही, दुधावरही या रोगाचा कोणताही परिणाम होत नाही. जिल्हा परिषदेकडे लस नसल्याची अफवा पसरली आहे मात्र २६५०० लसी उपलब्ध आहेत. आतापर्यंत ८४०० लसीकरण झाले आहे. पशुसंवर्धन विभागातून दहा लाखाची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली.

शुक्रवारी जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा सीईओ दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. लंपी हा विषय जिल्हा परिषद प्रशासनाने गंभीरपणे घेतला आहे. स्वामी यांच्यासह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांनी उपस्थित सर्व गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांना सूचना केल्या.

धोत्रे म्हणाले, जिल्ह्यात ३ गावांमध्ये लंपीचा शिरकाव झाला असला तरी हा रोग धोकादायक नाही. ज्याठिकाणी प्रादुर्भाव झालेल्या जनावरांपासून पाच किलोमीटर अंतरावर सर्व जनावरांना लसीकरण करण्यात आले आहे. ग्रामसेवकांनी प्रत्येक गावोगावी शेतकऱ्यांपर्यंत जाऊन जनावरांचे गोठे स्वच्छ करण्यास सांगावे, गोशाळा स्वच्छ ठेवाव्या, लक्षणे दिसताच जनावरांचे विलगिकरण करावे अशी माहिती द्यावी, आणि गटविकास अधिकाऱ्यांनो अलर्ट राहा अशा सक्त सूचना त्यांनी केल्या.

## मक्ता रद्दच्या भितीने मक्तेदारांचे धाबे दणाणले!

### घंटागाडी मक्तेदारांनी तात्काळ सादर केले बँक स्टेटमेंट!

सुराज्य/सोलापूर : 'मक्ता रद्द का करू नये'? या नोटिशीच्या आदेशामुळे घंटागाडी मक्तेदारामध्ये खळबळ उडाली आहे. बँक स्टेटमेंट व संबंधित कागदपत्रे न दिलेल्या सहापैकी अन्य चौघा मक्तेदारांनी देखील सकाळीच महापालिकेत उपायुक्तांना भेटून कागदपत्रे सादर केली. या संदर्भातील उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी माहिती दिली.

घनकचरा व्यवस्थापनांतर्गत घंटागाड्यांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याची यंत्रणा मक्तेदारांकडून महापालिकेने घेतली आहे. महापालिकेच्या आठ झोन मध्ये सहा मक्तेदार घंटागाडीवरील कर्मचारी पुरवित आहेत. मात्र महापालिकेच्या करारानुसार कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळत नसल्याची ओरड पुन्हा एकदा सुरू झाल्याने मक्तेदारांना मक्ता रद्द का करू नये, अशी नोटीस बजावण्याचे आदेश महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिले होते. यामुळे संबंधित मक्तेदारांचे धाबे दणाणले आहेत. स्टेटमेंट व संबंधित कागदपत्रे न दिलेल्या सहापैकी अन्य चौघा मक्तेदारांनी देखील सकाळीच महापालिकेत उपायुक्तांना भेटून कागदपत्रे सादर केली. या संदर्भातील माहिती स्वतः उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी दिली. यामुळे त्यांच्यावरील कारवाई आता टळण्याची शक्यता आहे. दरम्यान, घंटागाडी वरील कर्मचाऱ्यांचे हजेरी पत्रक, त्यांनी किती दिवस काम केले, त्यांना किती पगार अदा करण्यात आला, कशा पद्धतीने अदा केला यासंदर्भातही मक्तेदारांकडून माहिती मागविली आहे.

## ठोंगे पाटील यांची शिंदे गटाच्या शिवसेना जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती



सुराज्य/सोलापूर : लक्ष्मीकांत ठोंगे पाटील यांची एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेना जिल्हाप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. शिंदे गटाच्या शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाने ठोंगे पाटील यांना नियुक्तीपत्र दिले आहे त्यांच्याकडे माढा आणि सांगोला या दोन तालुक्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. लक्ष्मीकांत ठोंगे पाटील हे शिवसेनेचे सोलापूर जिल्हा सहसंपर्कप्रमुख होते. मात्र मध्यंतरीच्या काळात त्यांना सेनेतून निलंबित करण्यात आले होते. आता ठाकरे आणि शिंदे यांची सेना वेगळी झाल्यानंतर ठोंगे-पाटील शिंदे गटाच्या संपर्कात होते. त्यांना आता जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी दिली आहे.

## मागील हंगामाचा 'आरएसएफ' हंगामापूर्वी निश्चित करा

### आंदोलन अंकुशची साखर आयुक्तांकडे मागणी

सुराज्य/सोलापूर :



मागील एक वर्ष साखरेला ३५०० रुपया पेक्षा जादा दर मिळालेला आहे आणि इथेनॉल पासून कारखान्यांना जादाचे उत्पन्न मिळाले असून यावर्षी 'एफआरपी' पेक्षा जादा 'आरएसएफ' (रेव्हिन्यू शेअरिंग फॉर्म्युला) निघणार असल्यामुळे नवीन हंगामा पूर्वी मागच्या हंगामाचा आरएसएफ निश्चित करावा व चालू गळीत हंगाम सुरु होण्यापूर्वी तो शेतकऱ्यांना दिला जावा, अशी मागणी आंदोलन अंकुशने साखर आयुक्त शेखर गायकवाड यांच्याकडे केली आहे.

सी. रंगराजन समितीच्या ७०:३० सूत्रानुसार साखर व उपपदार्थाचे एकूण उत्पन्न काढून त्यातील ७०७ रक्कम शेतकऱ्यांना देण्याचा रेव्हिन्यू शेअरिंग फॉर्म्युलाचा २०१३ चा कायदा आहे. त्यानुसार हंगाम संपल्यावर १२० दिवसात कारखान्यांनी आपले हिशोब साखर आयुक्तालयास सादर करायचे असतात पण मागील एक वर्ष साखरेला ३५०० रुपये क्विंटल दर मिळत आहे.

उपपदार्थांना सुद्धा चांगला दर मिळाल्यामुळे यावर्षी आरएसएफ हा एफआरपी पेक्षा जादा मिळणार आहे त्यामुळेच आंदोलन अंकुश ने आरएसएफची मागणी साखर आयुक्तांकडे केली आहे. साखर आयुक्तालयाने दर वर्षी आरएसएफ ठरवायचा असतो त्याला ऊस दर नियंत्रण मंडळाची मान्यता घेऊन तो एफआरपी पेक्षा जादा निघाला असेल तर तो देणे कारखान्यांना बंधनकारक आहे पण साखर आयुक्तालयाने ऊस हंगामा अदयाप निश्चितच केला नाही. यावर्षी साखरेला व उप पदार्थांना मिळालेल्या बाजारभावाचा विचार केल्यास व आयुक्तालयाने प्रामाणिकपणे कारखान्यांचे हिशोब तपासल्यास एफआरपी सोडून आणखी १०० रुपये तरी मिळू शकतात व जे कारखाने 'बी हेवी मोल्यासीस' पासून इथेनॉल बनवत आहेत त्यांना अजून २५० रुपये शेतकऱ्यांना दुसरा हप्ता म्हणून द्यावे लागण्याची शक्यता आहे. यावेळी धनाजी चुडमुंगे, राकेश जगदाळे, बंटी माळी, जगदाळे बंडू होगले व पाटील उपस्थित होते.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**सार्वजनिक आरोग्य अभियंता**
**जलवितरण विभाग**
सा.आ.अ./जलवितरण
जावक क्रमांक : ७६४
दि. १६/०९/२०२२

**जाहीर प्रसिध्दीकरणाचा मसुदा**

सोलापूर महानगरपालिकेकडील मुख्य कार्यालयाकडील १५ वे वित्त आयोग अंतर्गत पाण्याची पाईपलाईन घालणे ई-निविदा बाबत. १) Tender ID - 2022-SMC-836151-1 या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. १७/०९/२०२२ सकाळी १०.०० वा. पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
प्र.सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

CMYK



## शिवामृत गार्डनला विद्यार्थ्यांची भेट

**अकलूज** : शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल यशवंतनगर या शाळेतील इयत्ता पहिली ते तिसरी च्या विद्यार्थ्यांची परिसर भेट शिवामृत गार्डन या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.सर्व विद्यार्थी त्यामध्ये उत्साहात सहभागी झाले होते. विध्यार्थ्यांना तेथे असलेली हिरवीगार झाडे, तसेच औषधी वनस्पती यांची माहिती करून देण्यात आली.सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळे प्रकारचे खेळ खेळून मनोरंजन केले. प्रत्येक वर्गाचे वर्ग फोटो काढून वनभोजनाचा आस्वाद घेण्यात आला. यामध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा डेअरी प्रॉडक्ट्स विषयी असलेला प्रात्यक्षिक उपक्रम पूर्ण करण्यात आला. इ १० वी तील सर्व विध्यार्थी व विज्ञान शिक्षिका सौ मंदाकिनी गुंड यांनी शिवामृत दूध संघ विझोरी येथे भेट देऊन तेथे तयार केले जाणारे डेअरी प्रॉडक्ट्स कशाप्रकारे बनविले जातात याची माहिती मुलांना दिली. अशाप्रकारे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील परिसर भेट हा उपक्रम पूर्ण करण्यात आला.

## राजकीय परिस्थिती बदलल्यामुळे गावगाडयातील विकास रखडला

**पिलीव** : महाराष्ट्रात गेली अडीच वर्षे महाविकास आघाडीचे म्हणजेच शिवसेना - कॉंग्रेस- राष्ट्रवादी कांग्रेसचे सरकार होते.यामध्ये या सरकारची दोन वर्ष कोरोनाच्या महामारीत गेली त्यांनंतर मात्र विकासकामांना चांगली गती मिळु लागली मात्र त्यांनंतर राज्यात मोठे नाटय घडले यामध्ये एकनाथ शिंदे सह शिवसेनेतील चाळीस आमदारांनी बंड केले आणी भाजप बरोबर जाऊन सत्ता स्थापन केली यामध्ये एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले आणी देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले. तेव्हापासून राज्यात राजकिय नाटय सुरु झाले जिल्हा नियोजन समिती मार्फत मंजुर केलेल्या कामांना या सरकारने ताबडतोब स्थगिती दिली. तसेच इतर अनेक कामे जी महाविकास आघाडी सरकारने मंजूर केली होती त्यामुळे गाव गाडयातील विकास च थांबला.तर अगोदर च जिल्हा परीषद,पंचायत समीतीची मुदत संपल्यामुळे त्या ठिकाणीं प्रशासक आहे. एकंदरीत महाराष्ट्रात जी राजकिय परिस्थिती निर्माण झाली आहे यामुळे गावगाडयातील विकास थांबला आहे.

## माळशिरस तालुका अध्यक्षपदी फय्याज मुलाणी यांची निवड

**अकलूज** : ऑल इंडिया मुस्लिम ओ. बी .सी. ऑर्गनायझेशन चे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अन्सारी व प्रदेशाध्यक्ष मुसा मुर्शिद यांच्या मान्यतेनुसार फडतरी तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर येथील फय्याज मुलाणी यांची ऑल इंडिया मुस्लिम ओ.बी.सी. ऑर्गनायझेशनच्या माळशिरस तालुका अध्यक्ष पदी निवड झाल्याचे पत्र ऑल इंडिया मुस्लिम ओ.बी.सी. ऑर्गनायझेशन चे मंत्रालयीन सचिव शाहरुख मुलाणी यांनी नुकतेच प्रदान केले. या नियुक्तीला अनुसरून आपले मनोगत व्यक्त करताना फय्याज मुलाणी म्हणाले की संघटना बळकट करण्यासाठी साठी व मजबूत करण्यासाठी तसेच संघटनेची ध्येयधोरणे सर्वसामान्य पर्यंत पोहोचवण्यासाठी मी सदैव तत्पर असुन समाजातील शालेय मुलांसाठी आवश्यक लागणारे विविध प्रकारचे दाखले उपलब्ध करून देणे तसेच समाजातील ज्या अडीअडचणी असतील त्या सोडविण्याचा प्रयत्न या संघटनेच्या माध्यमातून करणार असल्याचे फय्याज मुलांणी यांनी सांगितले.

## कर्मवीर विद्यालयासमोरील शौचालयातील दुर्गंधीमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास धोका

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्म वीर भाऊराव पाटील विदयालयासमोरील जागेत ग्रामपंचायतीने चक्क सार्वजनीक शौचालय बांधले आहे. या शौचालयाचे काम गेल्या अनेक दिवसांपासून अपुर्ण अवस्थेत आहे.काम अपुर्ण असुनही बाहेरुन येणारे प्रवाशी किंवा गावातील नागरिकांना शौचालयास जाणयाची सोयच नसल्याने लोक याच शौचालयाचा वापर करीत आहेत. याठीकाणी कोणत्या ही प्रकारची ड्रेनेजची सोय नसल्याने यातुन मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरली आहे. याठिकाणी या शौचालयाच्या शेजारी विदयार्थी सायकल लावतात तसेच जवळच फळ विक्रेते व्यापारी व इतरांना त्याचा प्रचंड त्रास होत आहे. खरे तर ग्रामपंचायतीने विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे तसेंच विद्यार्थ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे हे ग्रामपंचायतीचे काम असताना याठीकाणी ग्रामपंचायतीने शौचालय बांधुन आरोग्या चा प्रश्न निर्माण केला आहे तसेंच विद्यार्थ्यांना यामुळे सायकल लावण्यास जागाही शिल्लक राहीली नाही. ग्रामपंचायतीने याठीकाणी अपुर्ण असणाऱ्या शौचलयाचे काम ताबडतोब पुर्ण करुन आरोग्याचा निर्माण झालेला धोका दुर करण्याची मागणी विदयार्थी व पालकामधुन होत आहे.



## सुंदर सागर महाराज यांच्या सानिध्यात नातेपुते येथे दशलक्षण महापर्वाचा उपवास

**नातेपुते** : नातेपुते येथील श्रावक वैभव सुरेंद्र शहा, विराग राजेंद्र गांधी, ओम प्रितम गांधी यांनी जैन धर्मात पवित्र मानला जाणारा उपवास दशलक्षण महापर्व हा आचार्य श्री.१०८ सुंदरसागर महाराज यांच्या सानिध्यात राजस्थान येथील प्रतापगड या ठिकाणी दैनंदिनी विविध धार्मिक विधी करून दहा दिवस हा उपवास केला. हा उपवास करत असताना दहा दिवसांमध्ये दररोज सकाळी अकरा ते बारा यादरम्यान फक्त एक टाईम पाणी पिऊन हा उपवास केला जातो. जैन धर्मात या उपवासाला खूप महत्त्व आहे अनेक श्रावक श्राविका, लहान बालके हा एक दिवसाचा दोन दिवसाचा पाच दिवसाचा याप्रमाणे उपवास करतात तर काहींजण निर्जन काहींही न खाता पिता हा खडक उपवास करतात. आचार्य श्री.१०८ सुंदरसागर महाराज यांनी देखील या पर्व मध्ये निर्जन असा कडक्र काहींही न खाता-पिता उपवास केला. केलेल्या दहा दिवसाच्या उपवासानंतर राजस्थान ( प्रतापगड ) येथील श्रावक, श्राविका यांनी उपास धरणाऱ्या श्रावकांचा राजस्थान प्रतापगड येथे अठरा प्रकारचे वेगवेगळे बँड पथक लावून पालखी जुलुस काढुन घरोघरी त्यांचा सन्मान केला व उपवास सोडण्यासाठी शेवटच्या दिवशी उपवास धारक श्रावक यांना फळांचा ज्यूस देण्यात आला. हा उपवास राजस्थान ( प्रतापगड ) येथे जाऊन केल्याने नातेपुते येथील जैन समाज बांधवांमध्ये त्यांचे कौतुक होत आहे.श्रावक वैभव सुरेंद्र शहा, विराग राजेंद्र गांधी व ओम प्रितम गांधी यांच्या कुटुंबीयांनी हे घरी आल्यानंतर त्यांचे स्वागत करून औक्षण केले.

# शिक्षक, अभियंते देश घडविण्याचे काम करतात : वठारे

सुराज्य/सोलापूर

समाजात अभियंता घर उभारण्याचे कार्य करतो तर तर शिक्षक संस्कारक्षम पिढी निर्माण करण्याचे कार्य करतात. दोघे सकारात्मक पद्धतीने कार्य करीत देश घडविण्याचे व देशाला प्रगतीपथावर नेण्याचे कार्य करीत असल्याने त्यांचा सन्मान,गौरव करणे गरजेचे असून तो स्तुत्य उपक्रम अक्कलकोट लायन्स क्लब राबवित असल्याचे प्रतिपादन जिल्ह्याच्या माध्यमिक विभागाच्या उपशिक्षणाधिकारी सुलभा वठारे यांनी केले.



अक्कलकोट लायन्स क्लबच्यावतीने लायन्स शिशु व प्राथमिक शाळेच्या सभागृहात आदर्श शिक्षक व आदर्श अभियंता पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी उपशिक्षणाधिकारी वठारे या बोलत होत्या. या कार्यक्रमास जिल्हा परिषद शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे, डॉ.भीमाशंकर बिराजदार,जावेद पटेल, महेश हिंडोळे, शाळा ट्रस्ट अध्यक्ष राजेंद्र हत्ते, सचिव संतोष जिरोळे, खजिनदार डॉ.सुनील बिरादार,बाबासाहेब निंबाळकर, सुभाष गडसिंग, प्रभाकर मजगे, शिवपुत्र हळगोदे, डॉ.प्रदीप घिवारे, चेतन जाधव, शरीद वळसंगकर, शिवशरण खुबा, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका श्रीदेवी खुणे, शिशुच्या मुख्याध्यापिका महानंदा निलगार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक लायन्स अध्यक्ष मल्लिकार्जुन मसुती यांनी केले. डॉ.राधापल्ली सर्वकृष्णन, डॉ.मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे म्हणाले की शिक्षक व अभियंता या दोघांचे कार्य मोठे असून समाजाच्या जडणघडणीत ते महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच डॉ.भीमाशंकर बिराजदार शैलीदार भाषण करून उपस्थितांचे मने जिंकली. मान्यवरांच्या हस्ते आदर्श शिक्षक म्हणून महाविद्यालय श्रेणीतून मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे प्राध्यापक बाळासाहेब पाटील, कनिष्ठ महाविद्यालय श्रेणीतून नागणहल्ली ता.अक्कलकोट येथील केएसएम ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक रवींद्र नवले, माध्यमिक श्रेणीतून किणी (ता.अक्कलकोट) येथील श्री मल्लिकार्जुन विद्या विकास प्रशालेचे राजशेखर मंठाळे, प्राथमिक श्रेणीतून अक्कलकोट येथील श्री शारदामाता इंग्लिश मीडियमचे अभय शेटे तर प्री प्रायमरी श्रेणीतून अक्कलकोट येथील संस्कार प्री स्कूलच्या अन्नपूर्णा रामशेट्टी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार तर आदर्श अभियंता पुरस्कार मेकॅनिकल श्रेणीतून श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कै. कल्याणराव इंगळे पॉलिटेक्निक कॉलेजचे प्रा.मल्लू भोजपा माने,सिव्हिल श्रेणीतून धीरज अण्णाराव जनगोंडा, इलेक्ट्रिकल व टेलीकम्युनिकेशन श्रेणीतून वैजनाथ सायबन्ना खिलारी, कॉम्प्युटर सायन्स या श्रेणीतून पॉलिटेक्निक कॉलेजचे उपप्राचार्य विजयकुमार दत्तात्रय पवार व लिफ्टमधील तज्ञ व इलेक्ट्रिकल इंजिनिअर,मूळचे देशमुख बोरगाव येथील व सध्या पुण्यात स्थायिक झालेले उद्योगपती गणपती राम फुलारी यांना वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास हभप गुरव महाराज, मोहन चव्हाण, सुभाष खमीतकर, विठ्ठल तेली, शिरीष पंडित, प्रकाश उन्नत, गुरुपादप्पा आळगी, अप्पू संघापुरे, अशोक कडगंची आदी उपस्थित होते.

# अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णकाळ येणार : मुतालिक

## स्वेरीमध्ये अभियंता दिन साजरा व ऑलम्पस २ के २२ चे थाटात उदघाटन

**पंढरपूर** : जेंव्हा मी पदवीचे शिक्षण पूर्ण केले तेंव्हा आपला देश हा आर्थिक दिवाळीखोरीच्या गर्तेत होता. आपल्या देशाकडे तर पैसे नव्हतेच आणि जगातील इतर देशही आपल्याला कर्ज देण्यासाठी तयार नव्हते. आज आपण एका आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या देशामध्ये राहत आहोत. अभियांत्रिकीच्या विविध ब्रँचेसच्या विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये करिअरच्या उज्वल संधी उपलब्ध आहेत. भारताने संरक्षण दलाशी संबंधित दीडशे वस्तूंच्या आयातीवर बंधने घातली आहेत आणि त्या वस्तू भारतामध्येच उत्पादित करण्याचा सरकारचा मानस आहे. त्याच पद्धतीने एकूण १०२ मेडिकल उपकरणे आयात करण्यावर देखील भारताने बंदी घातली आहे आणि या उपकरणांचे उत्पादन भारतामध्येच करण्याचा उद्देश आहे. त्यामुळे आज आपण जे शिक्षण घेत आहात ते मनापासून घ्या आणि आपले भवितव्य उज्वल करा. इंजिनिअरिंग म्हणजे काय हे नीटपणे समजून घ्या. येणारा भविष्यकाळ हा अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णकाळ असणार आहे.' असे प्रतिपादन नाशिक येथील पॉझीटीव्ह मीटरिंग पंप्सचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक व सीआयआय, महाराष्ट्रचे माजी चेअरमन सुधीर मुतालिक यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट, पंढरपूर संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे भारतरत्न डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या १६१ व्या जयंतीनिमित्त स्वेरीच्या मध्यवर्ती असलेल्या ओपन एम्पी थिएटरमध्ये आयोजिलेल्या अभियंता दिन' व ऑलम्पस २ के २२' या



तांत्रिक महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक सुधीर मुतालिक हे उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमा पूजनानंतर प्रास्ताविकात ऑलम्पस २ के २२'चे विद्यार्थी अध्यक्ष प्रमोद आवळेकर यांनी ऑलम्पस २ के २२' या तंत्र महोत्सवाच्या विविध स्पर्धेचे व बक्षिसाचे स्वरूप स्पष्ट केले. या स्पर्धेत राज्यातील अभियांत्रिकी तसेच पदविका अभियांत्रिकीचे विद्यार्थी सहभागी झाले असून संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम नियोजन केले असून यासाठी विविध समित्या कार्यरत असून सर्वजण परिश्रम घेत आहेत. ऑलम्पस २ के २२' च्या राष्ट्रीय स्तरावरील तंत्रस्पर्धेसाठी संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, समन्वयक प्रा. डी.टी. काशीद यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी अध्यक्ष प्रमोद आवळेकर, विद्यार्थी सचिव दीपक शिंदे, सहसचिव आयेशा मुजावर, खजिनदार जान्हवी देवडीकर, सहखजिनदार श्रेयस कुलकर्णी, प्रा. सचिन काळे, प्रा.नितिन मोरे, प्रा.सहदेव शिंदे, प्रा.विजय सावंत, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापकवर्ग परिश्रम घेत आहेत.

## चारचाकी मालवाहू गाडीवर कारवाई

सुराज्य/सोलापूर

विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आसरा ब्रिज जवळ एका चार चाकी मालवाहू गाडी क्रमांक एम.एच.१३.सीटी. ०१९८ ही रस्त्याच्या मधोमध थांबून सार्वजनिक रोडवर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत मिळून आली आहे.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सिद्धेश्वर कल्याण स्वामी यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून मोहम्मदअली मोहम्मदरफीक शहापुरे (वय-२७, रा.कुमठा नाका) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास सुरू असे हे करीत आहेत.

# पोलिसांच्या हाती ना धागे, ना दोरे

### ■ सकाळी अन संध्याकाळी फक्त भेट

सुराज्य/उत्तर सोलापूर

उत्तर सोलापूर तालुक्यातील कवठे गावच्या सरपंच जैतुनबी शेख (वय ६३) या गायब होऊन १० वा दिवस उलटून गेले आहेत. मात्र, पोलिसांच्या हाती अद्यापर्यंत कोणतेही धागेदोरे सापडले नाहीत.

विशेष म्हणजे बुधवारी पोलिस उपायुक्तांसह तब्बल २५ पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांनी शोध घेतला. तेही रिकाम्या हातीच परतले आहेत. त्यामुळेच



कवठ्याच्या सरपंच भाभींच्या गायब होण्याचे गूढ आणखीन वाढतच चालले आहे.

कवठे गावच्या सरपंच असलेल्या जैतुनबी शेख या ७ सप्टेंबर रोजी परिसरातील शेतात शेळ्या चारायला गेल्या. परत आल्याचं नाहीत. शेळ्या आल्या पण भाभी काही आलीच नाही. मुलगा सरदार यांनी बेपत्ता असल्याची तक्रार केली. तपास चालू झाला. रोज सकाळी व संध्याकाळी फोउजफाटा घेऊन पोलीस दाखल. पण काहीच हाती लागत नसल्याने शोध घ्यायचा तरी कसा असा प्रश्न खुद्द पोलिसांनाच पडला आहे. गायब व बेपत्ता झाल्याची वार्ता जिल्हाभर पसरली. स्थानिक दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख, माजी आमदार दिलीप माने यांनी चौकशी केली. मात्र काय उपयोग होईना. लोकप्रतिनिधी असल्याने, पुरावा मिळत नसल्याने सरपंच भाभींना शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे. पुरावा म्हणून त्यांची एक चप्पल मिळाली आहे. २५ च्या वर अधिकारी अन पोलीसणी तपास केला, पन शोध काही त्यापुढे सरकत नसल्याची सद्यस्थिती आहे.

## सदगुरु कारखान्यातर्फे सभासदांना दिवाळी साखरेचे वाटप

**पिलीव** : राजेवाडी येथील श्री श्री सदगुरु साखर कारखान्यातर्फे सभासदांना ५ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर पर्यंत विभागीय कार्यालयात किंवा गावामध्ये साखरेचे वाटप करण्यात येणार आहे. ब्राऊन शुगर ४० रुपये किलो, पांढरी साखर २६ रुपये किलो, प्रमाणे सभासदांना ५० किलो साखरेचे वाटप सभासदांना करण्यात येणार आहे. सदर साखरेचे पैसे फक्त आनलाईन पद्धतीने स्वीकार ण्यात येणार आहे. सभासदांनी साखर नेताना स्वतःचे आधार कार्ड आवश्यक असल्याचे सभासदांना आवाहन केले आहे.

## उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सत्कार

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या अधिकारी, कर्मचारी व पत्रकारांचा सत्कार महाराष्ट्र राज्य कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत म्हटले आहे. यावेळी सचिव दिनेश बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्र राज्य कर्मचारी संघाचे राज्यस्तरीय सभा दिनांक १८ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता फडताळे सभागृह दिंडी मार्ग पंढरपूर येथे आयोजित करण्यात आले आहे.आमदार प्रशांत परिचारक, आ.समाधान अवताडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अति मुख्य कार्यक्रम अधिकारी संतोष धोत्रे, राज्यध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहे. यामध्ये जिल्हा परिषद, जिल्हा स्तरीय विविध विभागातील अधिकारी आदर्श कर्मचारी, कर्मचारी गौरव, कर्मचारी सेवा व कर्मचारी गौरव, विविध दैनिक व वृत्त वाहिनीतील पत्रकाराना कर्मचारी मित्र पुरस्कार देऊन उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल गौरविण्यात येणार आहे. राज्य भरातून महासंघातील पदाधिकारी व सदस्य उपस्थित राहणार आहेत असे ही देशपांडे यांनी सांगितले आहे.

# पांडुरंग कारखान्यास नॅशनल फेडरेशनचा देशपातळीवरील तांत्रिक कार्यक्षमतेचा पुरस्कार

## प्रशांतराव परिचारक यांना साखर उद्योग गौरव पुरस्कार

सुराज्य/श्रीपूर

**श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास नॅशनल फेडरेशन ऑफ को.ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लि, नवी दिल्ली यांचेकडून हंगाम २०२१-२२ करिता देशातील जास्त साखर उतारा विभागातील तांत्रीक कार्यक्षमतेचा प्रथम पुरस्कार मिळाला आहे. अशी माहिती कारखान्याचे चेअरमन आ. प्रशांतराव परिचारक यांनी दिली.**

तसेच कारखान्याचे चेअरमन मा.आ. प्रशांतराव परिचारक यांना डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशन (उद्ध) इंडिया या संस्थेचा सर्वोच्च समजला जाणारा साखर उद्योग गौरव पुरस्कार जाहिर झाला असून त्याचे वितरण खा. शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते दि.१८/९/२०२२ रोजी पुणे येथे होणार आहे.

द डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशन इंडिया हि संस्था साखर उद्योगामध्ये उल्लेखनिय काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यास पुरस्कार देवून गौरवित असते, या संस्थेने कारखान्याचे चेअरमन मा.आ. प्रशांतराव परिचारक यांना कारखानदारीमधील केलेल्या कार्याची दखल घेवून सन २०२२ या वर्षाचा पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहे. कारखान्याचे व्हा. चेअरमन कैलास खुळे, सर्व संचालक, कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी, अधिकारी यांनी कारखान्यामध्ये तांत्रिक कार्यक्षमतेचे काम प्रभावीपणे केल्यामुळे हा पुरस्कार मिळाला असल्याचे कारखान्याचे चेअरमन



कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याची प्रगती चौफेर सुरु असुन पांडुरंग कारखान्याने गळीत हंगाम २०२२-२३ सुरु करणेचे दृष्टीने संपुर्ण तयारी केली असून तोडणी व वाहतूक यंत्रणेसाठी ॲडव्हान्स वाटप केलेला आहे.या हंगामात कारखान्याकडे सुमारे १४ लाख मे.टनाच्या नोंदी असून या सर्व ऊसाचे गाळप कारखाना वेळेवर करणार आहे.तसेच आसवानी प्रकल्पही ९० के.एल पी डी क्षमतेने चालणार आहे.

- डॉ.यशवंत कुलकर्णी, कार्यकारी संचालक

मा.आ. प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले. सदर पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या शुभहस्ते नॅशनल फेडरेशन ऑफ को. ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लि, नवी दिल्ली येथे पुढील महिन्यात होणार आहे. श्रध्देय सुधाकरपंत परिचारक यांनी घालुन दिलेल्या आदर्शानुसार कारखान्याची वाटचाल सुरु असुन मा.आ प्रशांतराव परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे पुरस्कार मिळविणेची मालिका व कारखान्याची प्रगती अखंडीतपणे चालू ठेवली आहे. कारखान्यास नॅशनल फेडरेशन ऑफ को. ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लि, नवी दिल्ली यांनी तांत्रिक कार्यक्षमतेचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देताना खालील निकषाचे मुल्यमापन करुन पुरस्कार दिलेला आहे.

- **गाळप क्षमतेचा वापर**
  कारखान्याने ऊसाचे गाळप, क्षमतेच्या १०४.१७ टक्के इतके केले
- **वाया जाणारे साखरेचे प्रमाण**
  बगॅस, प्रेसमड, मळी इत्यादी घटकामधून वाया जाणारे साखरेचे प्रमाण कमीत कमी असणे
- **मिलहाऊसची कार्यक्षमता**
  कारखान्यामधील मिलहाऊसमध्ये लागणारे योग्य ते बदल केलेने मिलच्या कार्यक्षमतेत वाढ होवून रिडयुस्ड मिल एक्स्ट्रॅक्शन ९६.२९ टक्के इतके मिळाले आहे.
- **बॉयलिंग हाऊस कार्यक्षमता**
  बॉयलिंग हाऊसमध्ये क्लॅरिफिकेशन, पॅन व सेंट्रीफयुगल विभागामध्ये आधुनिकीकरण केल्याने रिडयुस्ड बॉयलिंग हाऊस रिकव्हरी ८९.३७ टक्के व रिडयुस्ड ओव्हरऑल रिकव्हरी ९६.४३ टक्के इतकी मिळाली आहे
- **स्टीमचा वापर**
  कारखान्याने प्रोसेससाठी लागणाऱ्या स्टीमचा वापर ३८.६९ टक्के इतका केला आहे
- **साखरेचा दर्जा**
  हंगाम २०२१-२२ मध्ये उत्पादित झालेल्या साखरेमध्ये एम-३० चे प्रमाण २७ टक्के, सुपर एस-३० चे प्रमाण ७३ टक्के आहे
- **कारखाना सांडपाणी प्रक्रिया प्लॅन्ट**
  महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या तत्वानुसार कारखान्यामध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. तसेच बॉयलरसाठी ईएसपी ही अत्याधुनिक यंत्रणा कारखान्याने उभारलेली आहे

# चिनी लोन ॲप्सना 'ईडी'चा दणका

## ४६.६७ कोटी रुपये केले जप्त

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**अंमलबजावणी संचालनालयने (ईडी) शुक्रवारी (१६ सप्टेंबर) चिनी लोन ॲप्सवर मोठी कारवाई केली आहे. ईडीने सांगितले की, या आठवड्यात छापेमारीनंतर ईझबझ, रॅझॉरपे', पेटीएम' आणि कॅशफ्री'च्या आभासी (वर्चुअल) खात्यांद्वारे जमा केलेले ४६.६७ कोटी रुपये जप्त करण्यात आले आहेत.**

ईडीने माहिती दिली की, ईझबझ प्रायव्हेट लिमिटेड पुणे यांच्याकडील एकूण ३३.३६ कोटी, कॅशफ्री पेमेंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, बंगळुरू- १.२८ कोटी, रॅझॉरपे सॉफ्टवेअर प्रायव्हेट लिमिटेड, बंगळुरू - ८.२१ कोटी आणि पेटीएम पेमेंट्स सर्व्हिसेस लिमिटेड नवी दिल्ली-१.११ कोटी. ५०० रुपये जप्त करण्यात आले आहेत. १४ सप्टेंबर रोजी दिल्ली, मुंबई, गाझियाबाद, लखनऊ आणि गया येथे या प्रकरणाशी संबंधित अनेक ठिकाणांवर छापे टाकण्यात आले होते.




तपासासंदर्भात दिल्ली, गुरुग्राम, मुंबई, पुणे, चेन्नई, हैदराबाद, जयपूर, जोधपूर आणि बेंगळुरू येथील बँका आणि पेमेंट गेटवेच्या १६ ठिकाणांचाही यात समावेश आहे. नागालँडमधील कोहिमा पोलिसांच्या सायबर क्राईम युनिटने ऑक्टोबर २०२१ मध्ये मनी लाँडरिंगचा हा खटला नोंदवला होता.

HPZ टोकन ही ॲप आधारित कंपनी आहे. बिटकॉइन आणि इतर क्रिप्टोकरन्सीमध्ये गुंतवणूक करण्याच्या नावाखाली त्यांनी वापरकर्त्यांना अधिक नफा कमावण्याचे आमिष दाखवले. यामध्ये यूपीआय आणि इतर पेमेंट गेटवेद्वारे वापरकर्त्यांकडून गुंतवणुकीचे पैसे घेतले गेले. सुरुवातीला काही अंशी रक्कमही गुंतवणूकदारांना देण्यात आली. मात्र, नंतर फसवणूक करणाऱ्यांनी पैसे देणे बंद केले आणि त्यांची वेबसाइटनेही काम करणे बंद केले.

आरोपानुसार, शिल्लक रक्कम विविध पेमेंट गेटवे आणि बँकांद्वारे वेगवेगळ्या व्यक्ती आणि कंपन्यांच्या खात्यात हस्तांतरित करण्यात आली. छाप्यादरम्यान, ईडीला कळाले की, ते बनावट पत्त्यावर काम करत होते. HPZ टोकन लिलियन टेक्नोकॅब प्रायव्हेट लिमिटेड आणि शिगु टेक्नोलॉजी प्रायव्हेट लिमिटेडद्वारे चालवले जात असल्याचे तपासात उघड झाले आहे. या फसवणुकीत गुंतलेल्या विविध कंपन्यांमागे गुरुग्राममधील जिलियन कन्सल्टंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचा सहभाग असल्याचा ईडीला संशय आहे.

### 'रॅझॉरपे,पेटीएम' ईडीच्या रडारवर का आहेत?

ॲप्सद्वारे आर्थिक फसवणूक झाल्याच्या १८ एफआयआर देशभरातील पोलीस ठाण्यांमध्ये दाखल आहेत. 'रॅझॉरपे, पेटीएम आणि कॅशफ्री' या ॲप्सच्या कार्यालयीन परिसरात चिनी व्यक्तींचा वावर असल्याचे आढळून आल्यानंतर या ठिकाणांवर पोलिसांनी छापेमारी केली. याप्रकरणी काही जणांची ईडीकडून चौकशी करण्यात येत आहे. व्यापारी ओळखपत्र आणि काही बँक खात्यांद्वारे लोकांची आर्थिक फसवणूक केली जात असल्याचे समोर आले आहे. या ॲप्सची संकेतस्थळे आणि कार्यालयीन पत्त्यासंदर्भातही काही गैरप्रकार होत असल्याचे ईडीच्या निदर्शनास आले आहे. पेटीएमने या छापेमारीसंदर्भात अद्याप अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. आम्ही तपास यंत्रणांना सहकार्य करत आहोत असे रॅझॉरपे' आणि कॅशफ्री या ॲप्सच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

### चिनी ॲप कर्ज प्रकरण काय आहे?

देशात कोरोना साथ सुरू झाल्यापासून काही ॲप्स ईडीच्या निशाण्यावर आहेत. या काळात अनेकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. यातून मार्ग काढण्यासाठी अनेकांनी या ॲप्सद्वारे कर्ज घेतले. कर्ज फेडण्याच्या विवंचनेतून अनेकांनी आत्महत्या केल्याचे प्रकार समोर आल्यानंतर यंत्रणांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला. हे ॲप्स डाऊनलोड करताना या ॲप्सने कर्जदारांची वैयक्तिक माहिती चोरल्याचा आरोप होत आहे. या ॲप्सद्वारे कर्ज घेतलेल्यांना व्याजासाठी मोठी रक्कम आकारण्यात येत होती. वैयक्तिक माहिती वापरून या कर्जदारांना या ॲप्सकडून धमकावण्याचा प्रकार होत असल्याचेही समोर आले आहे. याप्रकरणी मनी लॉड्रिंग कायद्याअंतर्गत ईडीकडून तपास करण्यात येत आहे. भारतीयांची बनावट कागदपत्रे वापरून त्या व्यक्तींना एका खोट्या कंपनीवर संचालक म्हणून दाखवायचे आणि गुन्हा करायचा, अशी या फसवणूकदारांची पद्धत असल्याचे एका ईडीच्या सूत्राने सांगितले आहे. हा सर्व प्रकार चिनी व्यक्तींकडून नियंत्रित करण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे.

# भारताला मॅन्युफॅक्चरिंग 'हब' बनवायचंय : मोदी

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**उझबेकिस्तानमधील समरकंद येथे सुरू असलेल्या शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले. यावेळी बोलताना त्यांनी भारताला लवकरच मॅन्युफॅक्चरिंग हब' बनवणार असल्याचे म्हटले आहे.**

जग कोविड-१९ चा सामना करत आहे. कोविड आणि युक्रेनच्या संकटामुळे जागतिक पातळीवर आयात-निर्यातीत अनेक अडचणी निर्माण झाल्यात आहेत. आम्हाला भारताला 'मॅन्युफॅक्चरिंग हब' बनवायचे आहे. त्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. आज भारतात ७० हजारांहून अधिक स्टार्ट-अप सुरू झाले आहेत. आम्ही विकासावर आमचे लक्ष केंद्रीत करत आहोत. मला आनंद आहे की, भारताची अर्थव्यवस्था ही जगात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

दरम्यान, यावेळी पंतप्रधान मोदी, रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन, चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि इतर नेत्यांमध्ये प्रादेशिक सुरक्षा आणि व्यापारवाढीवर चर्चा झाली. तत्पूर्वी उझबेकिस्तानचे पंतप्रधान अब्दुल्ला आरिफॉव्ह आणि समरकंदचे राज्यपाल यांनी पंतप्रधान मोदींचे समरकंदमध्ये स्वागत केले. समरकंदमध्ये होणाऱ्या शिखर परिषदेचे दोन सत्र होणार आहेत. पहिल्या सत्रात केवळ शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनचे सदस्य सहभागी होणार आहेत. तर दुसऱ्या सत्रामध्ये इतर देशांनाही निमंत्रित करण्यात येणार आहे.




# 'वेदांता-फॉक्सकॉन' महाराष्ट्रात आलाच कधी?

## आशिष शेलारांचं शिवसेनेला चॅलेंज

✔ सुराज्य/मुंबई

वेदांता-फॉक्सकॉनचा प्रकल्प महाराष्ट्रात येणार हे निश्चित होते तर ठाकरे सरकारच्या काळात तळेगावची जमीन संपादित का करण्यात आली नाही, प्रकल्पाचे भूमिपूजन का झाले नाही, असा सवाल भाजपचे मुंबई प्रदेशाध्यक्ष आशिष शेलार यांनी उपस्थित केला. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फॉक्सकॉनचा प्रकल्प महाराष्ट्रात येणार असल्याची विधानसभेत दिलेली माहिती खरी असल्याचा दावाही शेलार यांनी केला. मुख्यमंत्री म्हणाले होते की, हा प्रकल्प महाराष्ट्रात येत आहे. त्यानुसार वेदांता-फॉक्सकॉन कंपनी महाराष्ट्रात स्मार्टफोन आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या निर्मितीसाठी अलाईड हब उभारणार आहे. त्यामुळे आम्ही काही करुन वेदांता-फॉक्सकॉनचा प्रकल्प महाराष्ट्रात आणून दाखवू, असा छातीठोक दावा आशिष शेलार यांनी केला. ते शुक्रवारी एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते.

यावेळी आशिष शेलार यांनी युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. आदित्य ठाकरे हा प्रकल्प महाराष्ट्रात होता आणि नंतर तो गुजरातमध्ये नेण्यात आला, अशाप्रकारे बोलत होते.

मुळात वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्पासंदर्भात कोणताही करार झाला नव्हता. मग जो प्रकल्प महाराष्ट्रात आलाच नाही तो गेला कसा, असा सवाल आशिष शेलार यांनी आदित्य ठाकरे यांना विचारला. तसेच आदित्य ठाकरेंच्या या दाव्याचे पितळ उघडे पाडण्यासाठी ठाकरे सरकारच्या अडीच वर्षांच्या काळात राज्यात किती प्रकल्प आले, किती प्रकल्पांसाठी करार झाले, त्याची पायाभरणी झाली आणि किती प्रकल्पांच्या व्यवहारांमध्ये कट-कमिशन मागण्यात आली, या सगळ्याची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधीशांची चौकशी समिती नेमावी, अशी मागणी मी मुख्यमंत्र्यांकडे केल्याचेही शेलार यांनी सांगितले.



### लष्करी छावणीची भिंत कोसळली; ९ ठार

✔ सुराज्य/लखनऊ

लष्कराच्या छावणीची भिंत कोसळून ९ जण जागीच ठार झाल्यायची धक्कादायक घटना लखनऊमध्ये घडली आहे. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे.

लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, भिंत कोसळल्यानंतर मलब्याखालून एका व्यक्तीला वाचवण्यात यश आलं आहे. मुसळधार पावसामुळे लष्करी छावणीच्या सीमेवरची ही भिंत कोसळली. या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेले सर्वजण बांधकाम मजूर होते, असे लष्कराकडून सांगण्यात आले आहे.

## ६० लाखांचा मोदक, ८ लाखांचा हार

# लालबागच्या राजाला भरभरून दान

### लिलावातून १.२५ कोटींची कमाई

✔ सुराज्य/मुंबई

**यंदा गणेशोत्सव थाटामाटात पार पडला. दोन वर्ष कोरोनामुळे सण-उत्सव साजरे करण्यावर अनेक निर्बंध होते. सार्वजनिक गणेशोत्सवात अनेक मर्यादा घालण्यात आल्या होत्या. मात्र, यंदा बाप्पाचे वाजत-गाजत आगमन झाले आणि बाप्पाला मोठ्या उत्साहात निरोपही देण्यात आला. मुंबईतील गणेशोत्सवात सर्वात आकर्षणाचं केंद्र असलेल्या लालबागच्या राजाचा आगमन सोहळा आणि विसर्जन मिरवणूक उत्साहात पार पडली.**

यंदा कोणतेही निर्बंध नसल्याने राजाच्या चरणी दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. लालबाग राजाच्या दर्शनासाठी मोठी गर्दी पाहायला मिळाली. त्याशिवाय अनेकांनी लालबाग राजाच्या चरणी मोठे दानही केले आहे. मोठ्या प्रमाणात भाविकांनी सोने-चांदी दान केले आहे. बाप्पाचं विसर्जन झाल्यानंतर आता भाविकांनी दिलेल्या दानाचा लिलाव करण्यात आला आहे. या लिलावात अनेकांनी बोली लावली असून यातून मंडळाने १.२५ कोटी रुपये कमावले आहेत. तर एकूण कमाई ६.२५ कोटी रुपये इतकी झाली आहे.

लालबाग राजा मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब साळवे यांनी सांगितलं, की यंदा १.२५ कोटी रुपये कमाई झाली आहे. हा आकडा २०१९ मध्ये झालेल्या लिलावातील बोलीइतका आहे. लिलावाशिवाय लालबाग राजाच्या चरणी ५ कोटींहून अधिक रोख रक्कम दान करण्यात आली आहे. त्यामुळे यंदा गणेशोत्सवातील लालबाग राजाची एकूण कमाई ६.२५ कोटी रुपये इतकी आहे. लालबाग राजाला आलेल्या दानाचा लिलाव १५ सप्टेंबर रोजी झाला. या लिलावात १.२५ किलो वजनाचा मोठा सोन्याचा मोदक ६०.०३ लाख रुपयांना बोली लावून विकला गेला.



लालबाग राजा मंडळाचे कोषध्यक्ष मंगेश दळवी यांनी सांगितलं, की एक मोठा अतिशय सुंदर सोन्याचा हार ८.५५ लाख रुपयांना विकला गेला आहे. तर दुसरा आणखी एक सोन्याचा हार ३.२० लाख रुपयांना विकला गेला. एक किलो सोन्याच्या बिस्किटाची ५.७७ लाख रुपयांना विक्री झाली. लालबाग राजाला भेट म्हणून दिलेली एक बाईक एका खरेदीदाराने बोली लावत ७७००० रुपयांना विकत घेतली.

यावर्षी लालबाग राजाला आलेल्या दानात अनेक प्रकारच्या सोने-चांदीच्या वस्तू दान करण्यात आल्या आहेत. गोल्ड प्लेटेड लालबाग राजाच्या पादुका, अनेक देवतांच्या सोन्याच्या मूर्ती, सोन्याचे लहान-मोठ्या आकाराचे मोदक, चांदीचे हार, बाप्पाच्या बोटातील सोन्याच्या अंगठ्या अशा अनेक गोष्टींचे दान करण्यात आले आहे.

### ४५ वर्षांत प्रथमच नवे पाऊल

# काँग्रेस कार्यकारिणीची निवडणूक घेण्याची घोषणा

✔ सुराज्य/मुंबई

काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक जवळ येताच काँग्रेसने राष्ट्रीय कार्यकारणीसाठीही निवडणुका घेण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. काँग्रेसचे केंद्रीय निवडणूक प्राधिकरणाचे अध्यक्ष मधुसूदन मिस्त्री यांनी याबाबत माहिती दिली आहे. गेल्या ४५ वर्षांत पहिल्यांदाच राष्ट्रीय कार्यकारणीची निवडणूक होणार आहे.

काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत २३ सदस्य असून त्यापैकी १२ जणांची निवड निवडणुकीद्वारे घेण्यात येते, तर ११ जणांची निवड नामनिर्देशित पद्धतीने होते. जर राष्ट्रीय कार्यकारणीसाठी १२ पेक्षा जास्त अर्ज आले, तर राष्ट्रीय कार्यकारणीसाठी निवडणुका घेण्यात येईल, अशी माहिती मधुसूदन मिस्त्री यांनी दिली आहे. तसेच यासाठी काँग्रेसचे राज्य निवडणूक अधिकारी सर्व राज्यांना भेट देणार असून सर्व प्रक्रिया लवकरच पूर्ण केली जाईल, असेही ते म्हणाले.



दरम्यान, काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारणीसाठी ४५ वर्षांनंतर पहिल्यांच निवडणुका होणार आहेत. राष्ट्रीय कार्यकारणीसाठी शेवटची निवडणूक १९९७ मध्ये कोलकाता येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनादरम्यान झाली होती. तेव्हापासून आतापर्यंत काँग्रेसचे अध्यक्ष राष्ट्रीय कार्यकारणी घोषीत करत होते.

# महिलांच्या मृतदेहाची राख जाते चोरीला

✔ सुराज्य/अहमदनगर

**पाथर्डी तालुक्यातील करंजी येथे धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या गावातील स्मशानभूमीतून चक्क मृतदेहाची राख व अस्थी चोरीला जात आहे. अंत्यविधीनंतर उरणारी राख अगदी अस्थीसह चोरीला जात असल्याने गावकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. आतापर्यंत तीन ते चार वेळा अशा घटना गावातील घडल्याचं गावकर्यांनी म्हटलं आहे. या घटनेनंत गावकऱ्यांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.**

याबाबतची हकीकत अशी की, करंजी गावातील लिलाबाई वामन यांचे सोमवारी निधन झाले. करंजी गावातील उत्तरेश्वराच्या मंदिराजवळ त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मात्र दुसऱ्या दिवशी जेव्हा त्यांचे नातेवाईक राख सावडण्यासाठी म्हणजेच अस्थी घेण्यासाठी अमरधाम गेले असता त्यांच्या अस्थी व राख गायब झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

लिलाबाई यांच्या अंगावर पाऊणे दोन तोळे सोने होते. त्यांना नथ घालण्याचीही हौस होती. म्हणून त्यांच्या निधनानंतर त्यांच्या मुलांनी त्यांना नथ घातली होती. दागिने गेले याचे दुःख नाही, पण या घटनेमध्ये अस्थीच चोरून

### गावकऱ्यांची झोपच उडाली

नेल्या जात असल्याने आमचा संताप होतो आहे, अशी भावना नातेवाईक व्यक्त केली आहे.

महिलांचीच राख चोरीला जात असल्याने मृत महिलेच्या राखेतील दागिन्यांच्या हव्यासापोटीच या घटना घडत असल्याचे गावकऱ्यांनी म्हटले आहे. आतापर्यंत तीन ते चार वेळेला असे प्रकार घडले आहेत. त्यामुळे मृत व्यक्तींच्या नातेवाईकांच्या भावनेशी खेळण्याचा हा प्रकार असल्याचं गावकऱ्यांचे म्हणणे आहे. आता मृत व्यक्तिंच्या अस्थींच्या सुरक्षेसाठी वॉचमन किंवा cctv लावण्याची वेळ येणार असून



घडलेल्या एकूण प्रकारामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

## अनेक पिढ्यांना लक्षात राहील अशी शिक्षा देणार

✔ सुराज्य/उत्तरप्रदेश : उत्तरप्रदेशातील लखीमपूर खेरी येथील निघासन ठाणे क्षेत्रातील एका गावात १५ आणि १७ वर्षीय बहिणींवर बलात्कार करून त्यांची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हत्या केल्यानंतर या दोन्ही बहिणींचे मृतदेह झाडावर लटकवण्यात आले होते. या घटनेनंतर पोलिसांनी सहा आरोपींना आपल्या ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार या आरोपींपैकी पाचजण मुस्लीम तर एकजण हिंदू आहे. या प्रकरणानंतर उत्तर प्रदेशातील राजकीय वातावरण तापले असून यानंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर टीकेची झोड उठवली जात आहे.

## कॅप्टन अमरिंदर सिंग भाजपच्या वाटेवर

✔ सुराज्य/नवी दिल्ली : माजी मुख्यमंत्री आणि पंजाब लोक काँग्रेसचे संस्थापक अमरिंदर सिंग पुढील आठवड्यात भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. यावेळी ते त्यांचा पक्ष देखील भाजपमध्ये विलीन करतील. अमरिंदर सिंग यांच्या पक्षाच्या प्रवक्त्यांनी याबाबत माहिती दिली आहे. भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि इतर नेत्यांच्या उपस्थितीत अमरिंदर सिंग पक्षात प्रवेश करतील. काँग्रेसने अमरिंदर सिंग यांना मुख्यमंत्रिपदावरुन हटवल्यानंतर त्यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेत पंजाब लोक काँग्रेस हा पक्ष स्थापन केला होता. आता हा पक्ष देखील ते भाजपमध्ये विलीन करणार आहेत. प्रीतपाल सिंग बैलावल यांनी पीटीआय वृत्तसंस्थेला दिलेल्या माहितीनुसार काही माजी आमदार आणि एक माजी खासदार भाजपमध्ये प्रवेश करणार आहे. पंजाब लोक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष देखील पुढच्या आठवड्यात चंदीगडमध्ये भाजपमध्ये प्रवेश करतील.

## कर्जाच्या सापळ्यात अदानी समूह

✔ सुराज्य/नवी दिल्ली : भारतीय उद्योगपती गौतम अदानी जगातील पहिल्या १० अब्जाधीशांची यादी दुसरी सर्वात मोठे श्रीमंत बनले आहे. फोर्ब्सच्या रिअल टाईम बिलियनेअर इंडेक्सनुसार, जगातील पहिल्या १० अब्जाधीशांची यादी जाहीर करण्यात आली आहे, ज्यामध्ये अदानी यांनी फ्रांसच्या बर्नार्ड अर्नॉल्टला मागे टाकून विश्व क्रमवारीत दुसरे स्थान ताब्यात घेतले आहे. भारत आणि आशियातील सर्वात मोठे श्रीमंत गौतम अदानी यांच्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये यावर्षी लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे तुम्हीही अदानी ग्रुपच्या कंपन्यांमध्ये पैसे गुंतवले असतील तर ही बातमी तुमच्या कामाची आहे.

आता अदानी जगातील सर्वात श्रीमंतांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचले आहेत, पण स्वतः कदाचित अदानी हे जाणून आनंदी नसतील. याचे कारणही तितकेच मोठे आहे. भारताचे धनकुबेर म्हटल्या जाणाऱ्या अदानी समूहावर लाख कोटींचे कर्ज आहे. एका अहवालानुसार, अदानी जगातील शीर्ष पाच श्रीमंत लोकांपैकी एक असले तरी अदानी समूहावर कर्जाचा डोंगर आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

## सलमानला मारण्यासाठी बिश्नोई गँगने रचला होता प्लॅन

✔ सुराज्य/मुंबई : प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या हत्येचा कट रचण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली होती. सिद्धू मुसेवाला हत्याकांड प्रकरणातील आरोपीने चौकशीदरम्यान ही माहिती दिली होती. मुसेवाला हत्या प्रकरणामध्ये नेपाळ पोलिसांनी दीपक मुंडीसहीत कपिल पंडित आणि राजिंदर दोन शार्प शूटर्सलाही अटक केली. त्यातील कपिल पंडित याने सलमानच्या हत्येच्या कटाची माहिती पोलिसांना दिली होती. त्यात आता सलमान खानला मारण्यासाठी दुसरा प्लॅनदेखील तयार असल्याचं समोर आला आहे.

## 'आप' ची मान्यता रद्द करा

✔ सुराज्य/नवी दिल्ली : आम आदमी पक्षाची मान्यता रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठी माजी सरकारी अधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहले आहे. त्यात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावरही कारवाई करावी, असं म्हटलं आहे. गुजरातमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना आम आदमी पक्षासाठी काम करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप माजी सरकारी अधिकाऱ्यांनी केला आहे.

## भारतातील पहिला सीएनजी ट्रक लॉन्च

✔ सुराज्य/सोलापूर : टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने भारतातील पहिला सीएनजी संचालित मेडियम ॲण्ड हेवी कमर्शियल वेईकल ट्रक लॉन्च करत पुन्हा एकदा नवीन ट्रकिंग इतिहास रचला आहे.तसेच कंपनीने ड्रायव्हिंग सोयीसुविधा वाढवण्यसाठी आधुनिक अडवान्स्ड ड्रायव्हर असिस्टण्स सिस्टिम सादर करण्यासोबत त्यांच्या प्राइमा,सिग्ना व अल्ट्रा ट्रक्सच्या सर्वाधिक विक्री होणाऱ्या श्रेणीमध्ये जागतिक दर्जाच्या वैशिष्ट्यांची भर केली आहे.

## ग्रेट इंडियन फेस्टिव्हल २३ सप्टेंबरपासून होणार सुरु

✔ सुराज्य/सोलापूर : ॲमेझॉन इंडियाचा फेस्टिव्ह इव्हेंट, 'द ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल' २०२२ हा २३ सप्टेंबर २०२२ पासून सुरू होत आहे, ज्यामध्ये प्राइम सदस्यांना लवकर उपलब्धता मिळत आहे. लाखो लघु, मध्यम व्यवसायांमधील उत्पादनांच्या विस्तृत निवडीवर ग्राहक याआधी कधीही न पाहिलेल्या डिल्सचा आनंद घेऊ शकतात.

# ‘भाजपच्या ट्रॅक’ वरील शिंदेशाही परिवाराच्या प्रांतात बारामतीकरांच्या अश्वाची रपेट

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा आणि गॉडफादर बारामतीकर शरद पवार हे निमगावकर शिंदेशाहीच्या कुर्डूवाडी – माढा साम्राज्यात स्व. विठ्ठलराव शिंदे पुतळा अनावरण आणि शेतकरी मेळाव्यासाठी येत्या सोमवारी दि.१९ तारखेला येत आहेत. दरम्यान राष्ट्रवादीची फारकत घेऊन भाजपचे 'कमळ' हाती घेत माढा व्हाया नागपूर ते दिल्ली असा ट्रॅक ठेवण्यासाठी सज्ज असलेल्या माढ्याच्या शिंदेशाहीच्या कार्यक्रमात बारामतीकरांचा अश्व उधळणार असल्याने मुख्य राष्ट्रवादीसह भाजप आणि अन्य पक्षांचेही डोळे विस्फारले आहेत.**

- माढा–कुर्डुवाडीत चर्चांना अशरक्ष: उधाण
- 'कमळ' हाती घेण्याला सज्ज असलेल्या माढेकरांवर शरद पवार काय टाकणार गुगली?
- भाजपाच्या उंबरठ्यावरील शिंदेशाही शेतकरी मेळाव्यात बारामतीकर काका कशाची करणार पेरणी?
- कुर्डूवाडी–माढा व्हाया नागपूर ते राजधानी दिल्लीत काय जाणार मेसेज?

शिंदेशाहीचा कुर्डूवाडीतील पुतळा अनावरण सोहळा आणि शेतकरी मेळावा अन् त्याला शरद पवारांची उपस्थिती, या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, मुख्यत्वे कुर्डूवाडी - माढ्यासह जिल्ह्याच्या राजकारणात चर्चेला उधाण आले आहे. खास करून बाब म्हणजे, माढ्याचे राष्ट्रवादीचे आमदार बबनराव शिंदे तसेच त्यांचे सुपुत्र जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन 'कमळ' हाती घेत ते माढा - कुर्डूवाडीच्या आपल्या साम्राज्यात फुलविण्याचे पक्के केले, असे मानले जाते.

तथापि, या संदर्भातील सारी खबर बारामतीच्या गोविंद बागेत अन् मुंबईतील 'सिल्वर ओक'मध्येही पोहचल्या. आमदार बबनराव शिंदे आणि सुपुत्र रणजितसिंह शिंदे या पिता- पुत्राचा 'भाजपातील बारशा'चा कार्यक्रम केवळ औपचारिकरित्या पूर्ण होण्याचे शिल्लक असण्याच्या वळणावर बारामतीकर काकांची रपेट माढा -कुर्डूवाडी होत असल्याने अनेकांना आश्चर्य वाटत आहे. यातून सर्वच पक्षातील सर्वांच्या भूवया उंचावल्या आहेत. याच वळणावर राष्ट्रवादीचे भीष्म शरद पवार या कार्यक्रमात येऊन माढेकर शिंदेशाहीवर कोणती गुगली टाकणार? शिंदेशाहीने आयोजित केलेल्या सोहळ्यात विशेषतः शेतकरी मेळाव्यात जाणता राजा चाणाक्षपणे तसेच भविष्यातील शिंदेशाहीच्या राजकारणातील नांदी ओळखून कोणती साखर पेरणी करणार? याकडे जिल्ह्यातील राजकिय विश्लेषकांसह मुख्य राष्ट्रवादी भाजप, शिवसेना, काँग्रेस या सर्वच प्रमुख पक्षांसह शिंदेशाही समर्थकांचे लक्ष लागून राहिले आहे. विशेष करून शिंदेशाही पिता - पुत्रांचा भाजप प्रवेश निश्चित झाला असतानाही, राष्ट्रवादीच्या शरद पवारांना आपल्या प्रांतात आणून कार्यक्रम घेण्याचे जे धोरण आहे, त्याबाबत कुर्डूवाडी - माढा प्रांतातून नागपूर व्हाया दिल्लीपर्यंत काय मेसेज जाणार? नागपूरकर भाजपवाले देवेंद्र फडणवीस तसेच दिल्लीस्थित भाजपचे वरिष्ठ नेते या संदर्भात कोणता स्टँड घेणार? याचीही जोरकस चर्चा जिल्ह्याच्या राजकारणात पर्यायाने राजकीय जाणकारांमध्ये आता रंगू लागली आहे.



### चर्चा सिनेकाठी बांधाबाधांवर, घराघरात अन् मनामनातसुध्दा!

कधी काळी उजाड माळरान अशी ओळख असलेल्या माढा तालुक्यात हरित क्रांतीची पहाट आणलेल्या आमदार बबनराव शिंदे आणि त्यांच्या सुपुत्रांचा भाजप प्रवेश निश्चित झाल्याचे मानले जात आहे, असे असतानाच, राष्ट्रवादीच्या शरद पवारांना आणून आपले नेते कार्यक्रम कसा काय घेत आहेत? भाजपमध्ये जाण्याचा त्यांनी निर्णय बदलला आहे का? या आणि अशा चर्चांचे पेव माढा तालुक्यात सीना नदीकाठी शेताच्या बांधा बांधावर तसेच त्यांच्या समर्थकांमध्ये घराघरात मनामनात फुटले आहेत.

### बोले तो... मामा बिनधास्त !

आ.बबनराव शिंदे आणि त्यांचे सुपुत्र रणजितसिंह शिंदे यांच्या भाजप प्रवेशाची गोष्ट जगजाहीर झाली. त्या दरम्यान आमदार संजयमामा शिंदे यांनी आपण बारामतीकर प्रेमी आहोत, त्यांच्यावर आपली निष्ठा आहे, शिवाय राज्यातील तत्कालीन महाविकास आघाडी सरकारला आपला पाठिंबा आहे, असे जाहीर केले होते. त्यामुळे कुर्डूवाडीच्या कार्यक्रमाला शरद पवार येणे हे त्यांच्यासाठी वेगळे असे काही नाहीच, उलट विशेष आहे, त्यामुळे संजयमामा शिंदे बिनधास्त आहेत, अशी चर्चा त्यांच्या समर्थकांमध्ये आहे.

### कार्यक्रम पत्रिका पोहोचली फडणवीस यांच्या हातात !

शरद पवार आणि धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत कुर्डूवाडीत होणाऱ्या शिंदेशाहीच्या कार्यक्रमाची पत्रिका ही शिंदेशाही विरोधकांनी भाजपचे नेते आणि फडणवीस यांच्या हातात पद्धतशीरित्या पोहोचवून, जो काही निरोप द्यायचा होता, तो दिला आहे. त्याची पुसटशी चर्चा माढ्यात आहे.

### शिंदेशाही समर्थकांमध्ये उठली चुरचुर

आपले नेते बबनदादा आणि रणजितसिंहभैय्या यांनी भाजप प्रवेश निश्चित केला आहे, असे मानले जात असतानाच, त्यांनी शरद पवारांना आणून कार्यक्रम घेण्याचे ठरविले आहे, त्यामुळे आपल्या नेते मंडळींनी भाजपमध्ये जाण्याचा निर्णय रद्द केला आहे की काय? ते आपल्या राष्ट्रवादीतच राहणार आहे की काय ? या संदर्भात त्यांच्या खास समर्थकांमध्ये अस्वस्थता आहे अन् तशी चुरचुर उठली आहे.

---

## प्रदेश काँग्रेस कमिटीच्या प्रतिनिधींची निवड
## सुशीलकुमार, आ.प्रणितींसह १९ जणांचा समावेश

✔ सुराज्य/सोलापूर



महाराष्ट्र काँग्रेसने आपल्या प्रदेश काँग्रेस कमिटीच्या प्रतिनिधींची निवड केली आहे. ग्रामीण भागातून १४ तर शहरातून ५ जणांची निवड झाली आहे.

ग्रामीण प्रतिनिधींमध्ये सुशीलकुमार शिंदे, सिद्धाराम म्हेत्रे, सुरेश हसापुरे, रामहरी रुपनवर, धवलसिंह मोहिते पाटील, शाहीन शेख, नंदकुमार पवार, शिवाणी बिराजदार, धनाजी साठे, सुमित्रा उगले, तेजस्विनी मरूड, भीमाशंकर जमादार, साईनाथ बागल, सुशील बंदपट्टे यांची तर शहरी भागातील प्रतिनिधींमध्ये आमदार प्रणिती शिंदे, प्रकाश यलगुलवार, बाबा मिस्त्री, प्रकाश वाले, संजय हेमगड्डी यांचा समावेश आहे.

नव्याने नियुक्त झालेल्या प्रतिनिधींची बैठक १९ सप्टेंबर रोजी मुंबईच्या यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे महाराष्ट्र प्रदेश पीआरओ पल्लम राजू यांच्या अध्यक्षतेखाली, महाराष्ट्र प्रभारी एस. के. पाटील, प्रांताध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली आहे. या नूतन प्रतिनिधींची मुदत ही पाच वर्षे असून जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष, अखिल भारतीय काँग्रेस अध्यक्षांना मतदान करता येणार आहे. प्रदेशच्या कोणत्याही मिटींगला हजर राहता येणार असल्याने या निवडीला महत्व आहे.

## तीन वर्षानंतर 'आदिनाथ'चे धुराडे पेटणार
### अखेर शिखर बँकेने दिला संचालकांकडे ताबा

✔ सुराज्य/सोलापूर

करमाळा तालुक्यातील आदिनाथ सहकारी साखर कारखाना सलग तीन वर्ष बंद असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून संचालक मंडळ, बारामती अँग्रो व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक आणि कामगार यांच्यात न्यायालयात लढा सुरू असून अनेक घडामोडी नंतर शिखर बँकेने हा कारखाना संचालक मंडळाच्या ताब्यात दिला आहे. त्यामुळे विजया दशमीच्या शुभमुहूर्तावर कारखान्याचा बाँयलर पेटविण्यासाठी युद्ध पातळीवर तयारी सुरू केली आहे.असे कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक हरिदास डांगे यांनी सांगितले.

ऑक्टोबर २०२० मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने कारखाना सिल करून ताब्यात घेतला होता.त्यानंतर आता पुन्हा बँकेने संचालक मंडळाच्या ताब्यात दिला आहे.आता तो सुरु करण्यासाठी पैश्याची गरज असून आतापर्यंत डॉ.वसंतराव पुंडे, दत्तात्रय जाधव व प्रा.रामदास झोळ यांनी केलेल्या मदतीतून कारखान्यात कामे केली जात आहेत. आणखी पैश्याची गरज असून आदिनाथ बचाव समितीच्या बैठकीत ज्यांनी घोषणा केल्या होत्या त्यांनी त्वरित मदत जमा करावी असे आवाहन हरिदास डांगे यांनी करून कारखाना चालू गळीत हंगामात चालू करण्यासाठी आपण नेटाने प्रयत्नशील आहेत.

दसऱ्याच्या मुहूर्तावर बाँयलर पेटवून दिवाळीत कारखाना सुरू करावयाचा आहे. तर माजी आमदार नारायण पाटील व बागल गट हे मोलाचे सहकार्य करीत आहेत आणि मंत्री डॉ. तानाजी सांवत यांनी चांगली आर्थिक मदत केली आहे.तर तालुक्यातील इतर राजकीय मंडळी सुद्धा कारखाना सुरू करण्यासाठी मदतच करतील असा विश्वास हरिदास डांगे यांनी व्यक्त केला आहे.







### शेतकऱ्यांची दिवाळी गोड करणार : पाटील

आदिनाथ कारखाना उभारणी स्व.गोविंद बापू पाटील, गरिदास देवी व त्यांच्या अनेक सहकाऱ्यानी मोठ्या कष्टाने उभा केलेला कारखाना गिळंकृत करण्यासाठी बारामती अँग्रो टपली होती. परंतु तो डाव हाणून पाडत कारखाना सहकारीच राहिला पाहिजे या मतावर मी ठाम होतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी लाख मोलाचे सहकार्य केले आहे. आमच्या लढाईत आ.रणजितसिंह मोहिते पाटील, आ.राम शिंदे सर हे सोबत होते ते वेळोवेळी पाठपुरावा करीत होते. या सर्वांच्या सहकार्यामुळे दिवाळीत कारखाना सुरू करणार आहे, सर्वांच्या सहकार्याने शेतकऱ्यांना चांगले दिवस येती, असे माजी आ. नारायण पाटील यांनी सांगितले.

---

## सतराशे प्राथमिक लेआऊटची माहिती जी.आय.एस.मध्ये भरणार

✔ **सोलापूर** : जी.आय.एस. (Geographical Information System) म्हणजेच भूगोलिक माहिती प्रणालीमध्ये सोलापूर शहरातील महापालिका हद्दीत असलेल्या १७०० प्राथमिक लेआउटची माहिती भरण्यात येणार आहे. यापुढे बांधकाम परवानगी मागणी करताना प्लॉट धारकांनाच आता विकास शुल्क भरावा लागेल, अशी माहिती महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली.

सोलापूर शहरातील सतराशे प्राथमिक लेआउटची माहिती महापालिकेकडून जीआयएस प्रणाली मध्ये भरण्यात येणार आहे. यामध्ये अधिकृत बांधकाम विकास शुल्क भरण्यात आले की नाही, याचीही माहिती समाविष्ट करण्यात येणार आहे. त्याचबरोबर यासाठी हद्दक्षेत्र व मोजणी नकाशा आवश्यक आहे. सोलापूर शहरात दोन लाख ४० हजार एकूण मिळकती आहेत त्यापैकी ६५ हजार खुले प्लॉट्स आहेत. दरम्यान, यापुढे शहरात बांधकाम परवाना मागणी करताना प्लॉट धारकांना विकास शुल्क भरून घ्यावा लागणार आहे. असे महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी स्पष्ट केला आहे. सन २०१२ -१३ नंतर पुढे डिमांड रजिस्टर नोंदणी केली नसल्याचीही माहिती पुढे आली आहे. त्या संदर्भातील

### ... तर अधिकाऱ्यांकडून वसूल होणार खर्च

शहरात अंतिम लेआउट मंजूर नसलेले तसेच खाजगी सोसायटीमध्ये महापालिकेच्या निधीतून कोणतीही विकास कामे झाल्यास आता याचा झालेला खर्च संबंधित अधिकाऱ्याकडून, अभियंत्यांकडून वसूल केला जाईल अशी भूमिका महापालिका आयुक्तांनी घेतली आहे. अशा कामांची माहिती देखील घेणार असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले आहे.







## कलबुर्गी–कोल्हापूर रेल्वेचे उद्घाटन
### कुर्डूवाडीतील प्रवासी संघाकडून स्वागत

✔ सुराज्य/सोलापूर

नव्याने सुरू झालेल्या कलबुर्गी व्हाया कुर्डुवाडी कोल्हापूर नवीन रेल्वेचे गाडीचे खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांचे हस्ते सोलापूर रेल्वे स्थानकावर उद्घाटन करण्यात आले. कुर्डुवाडी रेल्वे स्टेशनवर सोलापूर जिल्हा प्रवाशी संघाचे वतीने जंगी स्वागत करण्यात आले. या गाडीचे इंजिन चालक तानाजी माने व डी.एल.पाटील यांना प्रवासी संघातर्फे पुष्पहार घालून त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी स्टेशन मुख्य प्रबंधक आर.ए. जानराव, सोलापूर जिल्हा प्रवासी संघाचे अध्यक्ष हर्षद मोरे, उपप्रबंधक पाडुळे, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गोरे, डॉ.आषिश रजपूत, भाजप युवा तालुकाध्यक्ष सुधीर गाडेकर, व्यापारी सेलचे तालुका अध्यक्ष सुराणा, मुख्य वाणिज्य निरिक्षक आर. एस.भानवसे, मुख्य तिकिट निरिक्षक विजय चवरे, मुख्य टी.एम.सी युवराज बागल, इन्चार्ज गायकवाड एम.के.दर्शन काशीद आदी उपस्थित होते.

मध्य रेल्वेमुळे भारताच्या कानाकोपऱ्यात तमाम सोलापूर जिल्ह्याला नेहमीच जाण्याची मोठी सोय झाली आहे. कलबुर्गी –कुर्डूवाडी– कोल्हापूर या नवीन गाडी सोडल्याने पश्चिम महाराष्ट्र व दक्षिण भारत एकमेकांना जोडला गेला. त्यामुळे आम्ही मध्य रेल्वेचे आभारी आहोत, असे जिल्हा प्रवासी संघाचे संस्थापक हर्षद मोरे यांनी सांगितले.

## राष्ट्रवादीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी प्रमोद गायकवाड यांची वर्णी

✔ सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी रिपाइंचे जेष्ठ नेते माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड यांची नियुक्त करण्यात आली असून २७ सप्टेंबर रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वे सर्वा शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे..



राज्यात महाविकास आघाडीचे सरकार कोसळ्या नंतर राज्यात आणि सोलापूर शहर जिल्ह्यातील अनेक नेते पक्षाला सोडचिट्टी देत असताना सोलापुरातील प्रमोद गायकवाड यांची वर्णी राज्याच्या उपाध्यक्षपदी लागल्याने भल्या भल्यांच्या भुवया उंचावल्या आहेत. गायकवाड यांची प्रदेश कार्यकरिणीवर करावी अशी शिफारस पक्षाचे निरीक्षक शेखर माने, शहराध्यक्ष भारत जाधव, माजी नगरसेवक तौफिक शेख यांनी श्रेष्टींकडे केली होती, त्या अनुसार गायकवाड यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्त केल्याचे जाहीर केले आहे. प्रमोद गायकवाड यांचे तौफिक शेख आणि ताज सोशल ग्रुपच्यावती सत्कार करण्यात आला.

### पक्षाची ताकद वाढवू : गायकवाड

पक्षाच्या मुख्य प्रवाहात सर्वसामान्य लोकांना समाविष्ट करून पक्षाची अधिकाधिक ताकद वाढवण्यासाठी राज्यस्तरावरून प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही यावेळी माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केली.

---

## पत्नीला मारहाण; पतीसह सहा जणांवर गुन्हा



✔ **सोलापूर** : मैत्रिणीचा फोटो खिशात दिसल्याने त्याची विचारणा केल्याने पतीने पत्नीस शिवीगाळ करत कोंडून ठेवून मारहाण केली. याप्रकरणी कोमल अजित माने (वय-२४, रा.उत्तर कसबा, बाळीवेस) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती अजित अशोक माने,सासू सुनिता अशोक माने,सासरे अशोक पंढरीनाथ माने, दीर अर्जुन अशोक माने, आरती संदीप जाधव, समीक्षा स्वामी (सर्व.रा.केगाव, पाणी टाकी, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पती अजित माने याच्या पतीच्या खिशात एका मुलीचा फोटो पत्नी कोमला दिसला. त्यावेळी कोमल माने यांनी पतीला विचारणा केली असता पतीने हा फोटो माझ्या मैत्रिणीचा आहे असे सांगितले व तू फोटो बाबत का विचारणा केली असे म्हणत तिला मारहाण केली. त्यानंतर अजित माने यांनी एका मुलीसोबत अश्लील कृत्य करून पैशाची मागणी करत कोमलचा यांचा सहा वर्षाचा मुलगा देण्यास नकार दिला.असे फिर्यादीत नमूद आहे.

### चार चाकी मालवाहू गाडीवर कारवाई

सोलापूर (प्रतिनिधी) विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आसरा ब्रिज जवळ एका चार चाकी मालवाहू गाडी क्रमांक एम.एच.१३. सीटी.०१९८ ही रस्त्याच्या मधोमध थांबून सार्वजनिक रोडवर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत मिळून आली आहे.याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सिद्धेश्वर कल्याण स्वामी यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून मोहम्मदअली मोहम्मदरफीक शहापुरे (वय-२७, रा.कुमठा नाका) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास सुरू असे हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने पळवली दुचाकी

सोलापूर (प्रतिनिधी) अज्ञात चोरट्याने घरासमोरील गेट समोर लावलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१२.बीएल. ८२७९ ही दुचाकी चोरून नेली.हि घटना दि.१० ते १३ सप्टेंबर दरम्यान काडीदी चाळ रेल्वे लाईन येथे घडली.याप्रकरणी मंजुनाथ गुरुलिंगप्पा मनुरे (वय-३२,रा. अक्कलकोट रोड) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोह.मुलाणी हे करीत आहेत.

## डॉ.मेतन फाऊंडेशनतर्फे सॅनिटरी पॅड, डिस्पोझेबल मशीन वाटप

✔ **सोलापूर** : डॉ.मेतन फाऊंडेशनतर्फे साने गुरुजी प्राथमिक शाळेला सॅनिटरी पॅड डिस्पोझेबल मशिन सोलापूरचे ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष घनश्याम दायमा यांच्या हस्ते मोफत देण्यात आले. या शाळेतील अनेक विद्यार्थिनी गरीब कुटुंबातील असून त्यांचे घर लांब असल्याने त्यांना मासिक पाळीदरम्यान सॅनिटरी नॅपकिन बदलण्यासाठी घरी जावे लागते. याच कारणाने अनेक विद्यार्थिनी शाळेला गैरहजर राहतात. या कारणासाठी या शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा चोधरी यांनी डॉ.फाऊंडेशनकडे सॅनिटरी पॅड डिस्पोझेबल मशिनची मागणी केली. डॉ. मेतन फोंडेशनने त्यांची मागणी तत्परतेने मान्य करून मशिन मोफत दिली.



प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सो. सुरेखा चौधरी यांनी केले. सोमेश्वर लवंगे यांनी डॉ. मेतन फाऊंडेशनच्या कार्याविषयी माहिती दिली. घनश्याम दायमा यांनी या उपक्रमाची प्रशंसा केली. सुरेखा चोधरी यांनी डॉ.मेतन फोंडेशनचे करीत असलेल्या सामाजिक कार्याचे कौतूक केले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी बूट व गरीब पालकांसाठी कपडे वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे घनश्याम दायमा, डॉ.मेतन फाऊंडेशनचे डॉ. व्यंकटेश मेतन, सोमेश्वर लवंगे आणि सिद्धाराम सक्करगी हे उपस्थित होते.